म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ............ ग्रा : वा
दा. क्र. १७६३

१७६३

१७६३
१७६३

BVBK-0401763

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.

दा. क्र. १५६३ २५।२।८५

विषय आ. वा.

वाचनालय बा.वा
१७६३
२८।२।८५


कथा-दैनंदिनी. रोज एक कथा सांगा.

३६० गोष्टी आणि १२ पुस्तकांचा संच.

# माघ

BVBK-0401763

पंढरीनाथ रेगे



अतुल बुक एजन्सी
प्रकाशन

३१७, नारायण पेठ, पुणे ३०

प्रकाशक
ना. गो. जोशी
अतुल बुक एजन्सी
प्रकाशन
३१७, नारायण पेठ
दैनिक प्रभातसमोर, पुणे ३०
फोन नं. ४४९५४१

© सर्व हक्क सुरक्षित

पहिली आवृत्ती :
२३ जानेवारी १९८५

मुद्रक :
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११०३०.

## राष्ट्रगीत

जनगणमन अधिनायक जय हे
भारत भाग्यविधाता ।।
पंजाब सिंधु गुजरात मराठा
द्राविड उत्कल वंग ।
विंध्य हिमाचल यमुना गंगा
उच्छल जलधितरंग ।
तव शुभ नामे जागे
तव शुभ आशिष मागे
गाए तव जयगाथा
जनगणमंगलदायक जय हे
भारत भाग्यविधाता ।।
जय हे, जय हे, जय हे, जय जय जय जय हे

मुलांचे मनोरजन आणि बौद्धिक वाढ होण्यासाठी या कथा लिहिल्या आहेत. या कामी भारतीय सांस्कृतिक कोष आणि इतर पौराणिक कथा यांचे अनेक वेळा सहाय्य लाभले. या सर्वांचा मी ऋणी आहे. त्याबद्दल त्यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

---

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | गणपतिपुळे | ५ |
| २) | पालीचा बल्लाळेश्वर | ६ |
| ३) | तिलपात्रदान | ७ |
| ४) | नाथद्वारा | ८ |
| ५) | विराटनगर | ९ |
| ६) | रथसप्तमी | १० |
| ७) | मोहिनीराजाची कथा | १० |
| ८) | वसतपंचमी | ११ |
| ९) | स्वातंत्र्यवीर सावरकर | १२ |
| १०) | ब्रह्मदत्ताचा सोबती | १४ |
| ११) | जया एकादशीची कथा | १६ |
| १२) | संकष्टचतुर्थी व्रताची कथा | १७ |
| १३) | सीताकुंड | १८ |
| १४) | बिलईमाता | १९ |
| १५) | शेतकऱ्याची कसोटी | २० |
| १६) | त्रिवेणी घाट | २१ |
| १७) | रामदास नवमी | २२ |
| १८) | धनुष्कोटी | २४ |
| १९) | अमृतवाणी | २५ |
| २०) | घरजावयाला नामी आहेर | २७ |
| २१) | घृष्णेश्वराची कथा | २९ |
| २२) | शिवरात्रीची गोष्ट | ३१ |
| २३) | शिवलीला | ३२ |
| २४) | लेपाक्षीची कथा | ३४ |
| २५) | रामेश्वराची कथा | ३४ |
| २६) | श्रीसप्तकोटीश्वर | ३७ |
| २७) | सिंगेश्वर | ३७ |
| २८) | मौनी अमावास्येची कथा | ३८ |
| २९) | तिलचतुर्थी | ३९ |
| ३०) | अग्निवेताळाची कथा | ४० |
| ३१) | एक शमीवृक्ष व विहीर यांची कथा | ४२ |
| ३२) | जुळ्या राजपुत्राच्या नशिबाचा | ४२ |
| ३३) | विजयाएकादशी | ४८ |

शाखा.
१७६३ २८।२।६५

# १ गणपतिपुळे

रत्नागिरीजवळच्या गणपतिपुळे या क्षेत्रात माघ शुद्ध, या तिथी-पासून पंचमीपर्यंत मोठा उत्सव होतो. इथला गणपती स्वयंभू मानतात. दोन गंडस्थळं, खाली नाभी व दोन हात एवढंच इथल्या गणपतीचं रूप आहे. प्रदक्षिणेची वाट फरसबंदीची असून ती डोंगराभोवती पाऊण मैलाची आहे.

सबंध भारतात चार दिशांना चार मंगलमूर्तींची जी महास्थानं आहेत, त्यांना द्वारदेवता म्हणतात. पुळे इथला गणपती त्यांपैकी एक होय.

हे देवस्थान समुद्रकिनाऱ्यावरील वालुकामय भागावर आहे, म्हणून याला गणपति-पुळे म्हटलं जातं. या क्षेत्रासंबंधीची कथा अशी—

परशुराम गणेशभक्त होता. त्यानं गणपतीला प्रसन्न करून घेऊन त्याच्याकडून परशू मिळवला. दुष्ट शत्रूंचा संहार या परशूच्या साह्यानं त्यानं केला. पश्चिम सागर हटवून परशुराम क्षेत्रही नंतर त्यानं निर्माण केलं. या क्षेत्रात उपासना करण्यासाठी आवडतं दैवत हवं म्हणून त्यानं गणपतीची प्रार्थना केली. तेव्हा गणपतीनं दृष्टांत दिला की, पर्वतरूपानं मी या सागरतीरावर विराजमान आहे. मग परशुरामानं इथं त्याची आराधना केली. तेव्हापासून हे क्षेत्र प्रसिद्ध पावलं.

इतिहासकाळात विजापूरच्या बादशहानं या देवस्थानाला दरसाल तीनशे रुपयांची नेमणूक करून दिली होती. शिवाजी महाराजांनी या देवस्थानाला भेट देऊन इथं पुराण-निरूपणासाठी काही व्यवस्था करून दिली होती हरभटजी पटवर्धन यांनी इथं उग्र तपस्या करून गजाननाला प्रसन्न करून घेतलं होतं. त्यावेळी 'देशावर जा, म्हणजे तुझं

भाग्य उदयाला येईल,' असा दृष्टांत गजाननानं दिला. पुढं हरभटजी देशावर गेल्यावर पेशवाईत त्यांचं घराणं नावारूपाला आलं. सर्व पटवर्धन संस्थानिक हे आपलं कुलदैवत मानू लागले. माधवराव पेशवे व सौ. रमाबाई यांनी इथं धर्मशाळा बांधली. तसंच शेंडेशास्त्री यांना पुराणाबद्दल सनद करून दिली. सरदार गोविंदपंत बुंदेले यांनी प्रदक्षिणेची पारवाडी बांधली. पटवर्धन संस्थानिकांनी तर इथं नित्यपूजा, अनुष्ठान, नैवेद्य, पुराण व चौघडा अशी सगळी व्यवस्था लावून दिली.

## २ पालीचा बल्लाळेश्वर

कुलाबा जिल्ह्यातील पाली इथं अष्टविनायकांपैकी बल्लाळेश्वराचं स्थान आहे. माघातल्या शुद्ध चतुर्थीला इथं मोठा उत्सव होतो. त्यात तृतीयेला संध्याकाळी देवाची पालखी निघते. ती घरोघर थांबून जाते. प्रत्येक घरची माणसं देवाला पंचारती ओवाळतात.या गणपतीला बल्लाळ विनायक असंही म्हणतात. हे स्थान खूप प्राचीन असून गणेशपुराणात व मुद्‌गल पुराणात त्याबद्दल अशी कथा सांगितली आहे–

कृतयुगात पल्लीपूर (सध्याचे पाली) या नगरात कल्याणश्रेष्ठी हा धनवान वैश्य राहत होता. त्याला बल्लाळ नावाचा मुलगा होता. त्याला लहानपणापासून गणपतीची भक्ती जडली. त्यानं सवंगड्यांसह रानात एक मोठाला दगड गणपती म्हणून स्थापला. दिवसभर तो तिथं राहून त्या गणपतीची पूजा करण्यात गढलेला असे. त्याच्याबरोबर ते सवंगडीही असायचे. यामुळं त्या सगळ्या मुलांची प्रकृती ढासळली. ते पाहून त्या मुलांचे वडील कल्याणश्रेष्ठीकडं तक्रार घेऊन गेले, की तुझ्या मुलाच्या नादानं आमची मुलं खराब झाली.

हे ऐकून कल्याणश्रेष्ठीला बल्लाळाचा राग आला. सोटा घेऊन तो रानात गेला. तर शेंदूर फासलेल्या एका दगडापुढं बल्लाळ ध्यान करीत बसलेला व बाकीची मुलं देवाची इतर सेवा करण्यात गढलेली दिसली. हा प्रकार पाहून रागारागानं त्यानं बल्लाळाला बेदम मारलं. तरीसुद्धा

त्यानं देवाचं ध्यान सोडलं नाही. तेव्हा तशाच अवस्थेत त्याला जवळच्या झाडाला बांधून ठेवलं व तो घरी परतला. बाकीची मुलं घाबरून आधीच पळाली होती.

थोडचा वेळानं बल्लाळ ध्यानातून भानावर आला. तेव्हा आपल्याला बंधनातून सोडवण्याबद्दल त्यानं गणपतीची प्रार्थना केली. ब्राह्मणाच्या रूपानं गणपती प्रकट झाला. तत्काल बल्लाळ बंधनातून मोकळा झाला. बल्लाळानं गणपतीला ओळखलं. त्यानं देवाला प्रार्थना केली— "तू इथंच राहा आणि भक्तांचं रक्षण कर." 'तथास्तु' म्हणत गणपती बोलला : "भाद्रपद शुद्ध चतुर्थीला या स्थानाची यात्रा करणाऱ्यांचे मनोरथ पूर्ण होतील."

बल्लाळाला गणपती प्रसन्न झालेला पाहून लोक थक्क झाले. बल्लाळेश्वर गणेशाची तिथं स्थापना करायला ब्राह्मणांनी त्याला मदत केली. त्यावर मग मंदिर उभारण्यात आलं. प्रथम हे देऊळ लाकडी होतं. पुढं १७७० साली श्रीमंत बाबुराव फडणीस व त्यांचे चिरंजीव मोरोबादादा यांनी सध्या आहे तसं दगडी देवालय बांधलं.

बल्लाळेश्वराची मूर्ती तीन फूट उंचीची पण रुंदट आहे. कपाळ खोलगट असून सोंड डावी आहे. बेंबीत व डोळ्यांच्या ठिकाणी चकाकते हिरे बसवलेले आहेत.

या मंदिरामागं ढुंढी विनायकाचं देऊळ आहे.पूर्वी बल्लाळ रानात मित्रांसह जी मूर्ती पूजायचा तीच ही, अशी दंतकथा सांगतात.

## ३ तिलपात्रदान

संक्रांतीच्या दिवशी तिळानं व पायसानं भरलेली धातूची दोन पात्रं ब्राह्मणाला दान देतात. यावेळी "तिळाची उत्पत्ती कश्यपापासून झाली असून, तीळ पापहारक व शुभ आहेत, म्हणून तिळपात्राच्या या दानानं (हे प्रभो) मला शांती दे," अशा अर्थाचा मंत्र म्हणतात. याशिवाय ३२ मुठी तीळ घातलेलं ताम्रपात्र दक्षिणेसह माघ महिनाभर दान दिल्यानंही दात्याला पुण्य लाभतं, असं सांगितलं आहे.

# ४ नाथद्वारा

राजस्थानात उदयपूरजवळ, बनास नदीच्या काठी नाथद्वारा हे वल्लभ संप्रदायाचं क्षेत्र आहे. इथला श्रीनाथ म्हणजे गोकुळचा कृष्णच. या मूर्तीची कथा अशी आहे—

वल्लभाचार्य आपल्या पंथाच्या प्रचारासाठी एकदा झारखंड भागात हिंडत होते. तेव्हा एके रात्री त्यांच्या स्वप्नात श्रीनाथ आला. त्यानं दृष्टांत दिला, की— " गोवर्धन पर्वतावर माझी मूर्ती आहे, तिची आराधना करीत जा. " वल्लभाचार्यांनी गोवर्धनावर जाऊन पाहिलं, तर त्यांना ती मूर्ती सापडली. त्यांनी तेच आपल्या संप्रदायाचं उपासना दैवत मानलं व तिथंच त्याची स्थापना केली.

पुढं सतराव्या शतकाअखेर मोगल बादशहा औरंगजेब यानं हिंदूंच्या देवालयाचा विध्वंस आरंभला. तेव्हा श्रीनाथानं आपल्या भक्तांना त्यांच्या स्वप्नात जाऊन सांगितलं— " मला इथून दूर कुठंतरी घेऊन जा. " त्यावेळी उदयपूरच्या गादीवर असलेला राणा राजसिंह श्रीनाथाचा भक्त होता. त्यानं ती मूर्ती एका रथात ठेवून भक्तमंडळीसह उदयपूरची वाट धरली, तर वाटेत सिहद इथं रथाची चाकं जमिनीत रुतून बसली. खूप खटपट करूनही रथ जागचा हालेनासं पाहून भक्त-मंडळीला वाटलं, की, देवाला सिहद गावीच राहायचं असावं. तेव्हा राजानं उत्सवपूर्वक तिथंच त्या मूर्तीची स्थापना केली. मंदिर उभारलं आणि देवस्थानासाठी त्या गावचं उत्पन्न लावून दिलं.

काळ्या पाषाणाच्या या मूर्तीला फक्त दोनच हात असून, उंच उभारलेल्या डाव्या हाताची करांगुळी वर उभी धरलेली आहे. म्हणजे कृष्णानं गोवर्धन पर्वत करांगुळीवर सावरला, त्या पावित्र्यात ही मूर्ती खडी आहे.

जन्माष्टमी, नंदमहोत्सव, गोवर्धनपूजा व वसंतपंचमी हे उत्सव इथं मोठ्या प्रमाणात साजरे होतात.

बरेच गुजराती धनवान लोक या देवाचे भक्त असल्यानं या देव-स्थानाला त्यांनी मोठं वैभव प्राप्त करून दिलं आहे. देवस्थानचा रोजचा

खर्चच मुळी दहा हजारांच्या घरात जातो. देवाचा रोजचा नैवेद्य दुधा-तुपाच्या पदार्थांचा असतो. केशर-कस्तुरी दळतात सोन्या-चांदीच्या जात्यांवर.

वल्लभ संप्रदायातली प्रत्येक सुवासिनी आपला एकतरी बहुमोल दागिना श्रीनाथाला अर्पण करतात. अशा अर्पण केलेल्या अलंकारांनी देवालयाच्या आवारातली एक कोरडी विहीर भरून गेली आहे.

## ५ विराटनगर

सातारा जिल्ह्यातील वाई हे प्राचीन क्षेत्र प्राचीन काळी विराट-नगर म्हणून ओळखलं जाई. याबद्दलची आख्यायिका अशी आहे—

पांडव त्यांच्या अज्ञातवासाच्या काळात इथं राहिले होते. त्या-वेळच्या काही खुणा इथं दाखवल्या जातात. गावाच्या पूर्वेकडील ओढ्याला कीचक किवरा म्हटलं जातं. भीमानं त्या काळी कीचकाला ठार मारलं, त्याच्या रक्ताचा पाट वाहिला त्याचा ओढा बनला. त्या-वरून कीचक किवरा या नावानं हा ओढा ओळखला जातो.

वाईला कृष्णा नदीचा उत्सव होतो. कृष्णेच्या वेगवेगळ्या घाटां-वर वसंत पंचमीपासून होळीपौर्णिमेपर्यंत उत्सव साजरे करण्याची प्रथा आहे. या उत्सवासंबंधीही एक कथा आहे, ती अशी—

शिवाजीमहाराजांचा काटा काढण्याच्या इराद्यानं अफझुलखान वाईला तळ ठोकून होता. त्याच्यावर मात करण्यात महाराजांना यश लाभावं म्हणून रामडोह आळीतल्या लोकांनी रामेश्वराशी अनुष्ठान केलं. महाराजांना ही गोष्ट कळली, तेव्हा अफझुलखानावर विजय मिळताच त्यांनी या लोकांचा अगत्यानं गौरव केला. आपल्याला विजय मिळाला हा कृष्णेचा कृपाप्रसाद मानून कृष्णेच्या उत्सवासाठी त्यांनी वार्षिक इमानही दिलं. तेव्हापासून हे उत्सव सुरू झाले.

## ६ रथसप्तमी

माघ शु. ७ : या तिथीला रथसप्तमी म्हणतात. याखेरीज अचला-सप्तमी, जयंतीसप्तमी, भास्करसप्तमी, महासप्तमी, माकरीसप्तमी अशी इतर नावंही हिला आहेत.

कंबोज देशात यशोवर्मा या राजाला म्हातारपणी मुलगा झाला. तो रोगी होता. त्याला आरोग्य कसं लाभेल ? म्हणून यशोवर्मानं एका ज्योतिष्याला विचारलं. ज्योतिषी म्हणाला : "पूर्वीच्या जन्मात यानं गोरगरिबांचा छळ केला. तसंच सूर्याची पूजा केली नाही. म्हणून याची ही अवस्था झाली आहे. तेव्हा तुम्ही रथसप्तमीला सूर्याची पूजा केल्यास तो निरोगी बनेल." राजानं त्याप्रमाणं करताच मुलगा रोगमुक्त होऊन सुखी झाला.

दक्षिणेत या तिथीला गायनवादन, दीपोत्सव व रथोत्सव करतात. या तिथीला राजस्थानात भानुसप्तमी मानतात व सूर्याची पूजा करून त्याच्या रथाची मिरवणूक काढतात.

## ७ मोहिनीराजाची कथा

महाराष्ट्राच्या नगर जिल्ह्यातील नेवासे इथं महालिया व मोहिनी-राज या देवतांचं मंदिर असून माघ महिन्यात मोहिनीराजाची मोठी यात्रा भरते. माघ शुद्ध अष्टमीपासून चतुर्दशीपर्यंत इथं भागवतसप्ताह होतो.

मोहिनीराजाची मूर्ती अर्धनारी असून चतुर्भुज आहे. हातांत शंख, चक्र, गदा, व अमृतकुपी आहेत. पायाखाली राहू असून शेजारी लक्ष्मीची बैठी मूर्ती आहे. महामाया व मोहिनीराज या देवतांविषयी कथा अशी—

पूर्वी हे स्थान क्षीरसागराच्या तीरावर होतं. देवदैत्यांनी या ठिकाणी केलेल्या समुद्रमंथनातून अमृत निघालं. तेव्हा असुरांना चकवून ते देवांना वाटण्यासाठी विष्णूनं मोहिनीरूप घेतलं. त्यावेळी राहू देव-

वेषात चंद्र-सूर्यांच्या मधे जाऊन बसला. मोहिनीनं नकळत त्याच्याही हातावर अमृत घातलं. पण तो दैत्य आहे, असं चंद्र-सूर्य यांनी तिला सांगितलं. तेव्हा सुदर्शनचक्रानं राहूचा शिरच्छेद करण्याचं तिनं ठरवलं. पण मोहिनीरूपात असलेल्या विष्णूला सुदर्शन चक्राचं आवाहन करता येत नव्हत. म्हणून मोहिनीनं अर्धं रूप विष्णूचं म्हणजे नराचं व अर्धं रूप नारीचं घेऊन चक्र पैदा केलं व राहूचा शिरच्छेद केला. तर, महालया व मोहिनीराज अशा त्या दोन्ही रूपांत ती नेवासे इथं वास्तव्य करून राहिली.

राहूचा शिरच्छेद होत असताना त्याच्या हातातलं अमृत प्रवरा नदीत पडलं, अशी आख्यायिका आहे. म्हणून इथं तिला अमृतवाहिनी म्हणतात.

## ८ वसंत पंचमी

माघ शु. ५ : या तिथीला वसंतपंचमी म्हणतात. या दिवसापासून वसंतोत्सव सुरू होतो. माघ महिन्यात मकरसंक्रांतीपासून वसंताच्या आगमनाची पूर्वलक्षणं दिसू लागतात. मात्र वसंतोत्सव मुख्यतः उत्तर भारतात नाना प्रकारे साजरा करतात.

वसंतपंचमीला नवीन पिकांच्या लोंब्या घरातल्या देवतेला अर्पण करतात; व मग नवान्न भक्षण करतात. सरस्वतीची जननी म्हणून या दिवशी तिची पूजा करतात.हाच लक्ष्मीचाही जन्मदिन मानतात.त्यावरून या तिथीला श्रीपंचमीही म्हणतात. त्यानिमित्त विष्णू-लक्ष्मीची पूजा करतात. राजस्थानात हा सण उत्साहानं साजरा करतात.

वसंतपंचमीच्या दिवशी कोणाच्याही बागेत शिरून फळं तोडण्याची मुभा असते.


वसंतोत्सव या तिथीपासून फाल्गुन पौर्णिमेपर्यंत चालतो. उत्तर भारतात– विशेषतः राजस्थान भागात हा उत्सव उत्साहानं साजरा करतात.

## ९ स्वातंत्र्यवीर सावरकर

माघ महिन्यात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची पुण्यतिथी येते. भारताच्या स्वातंत्र्यासाठी प्राणपणानं क्रांतिकार्य करणारे विनायकराव सावरकर थोर स्वातंत्र्यवीर ठरले. त्याचप्रमाणं त्यांनी समाजसुधारणेचं व हिंदुसंघटनेचं कार्यही केलं. महाकवी म्हणूनही ते अग्रेसर ठरले.

सावरकर बॅरिस्टर होण्यासाठी १९०६ साली इंग्लंडमधे गेले. तर तिथूनही त्यांनी गुपचूपपणे क्रांतिकार्य चालवलं. लंडनहून ते भारतीय क्रांतिकारकांना ग्रंथ, बाँब बनवण्याची पत्रकं व पिस्तुलं या-ना-त्या मार्गानं पाठवीत राहिले. तपासणी-अधिकाऱ्यांना (सेन्सॉरला) शंका येऊ नये म्हणून निरुपद्रवी वाटणाऱ्या ललित वाङ्मयाच्या ग्रंथांचा आतला भाग कौशल्यानं कोरून त्यांत लपवून त्यांनी पिस्तुलांची पार्सलं भारतात पाठवली. अशाच एका पिस्तुलाचा वापर करून अनंत कान्हेरे यांनी नासिकमधील विजयानंद नाटयगृहात १९०९ साली २१ डिसेंबर रोजी कलेक्टर जॅक्सन यांना ठार केलं. कान्हेरे यांनी यावेळी वापरलेलं पिस्तुल सावरकरांनी भारतात पाठवल्याचं सरकारला तपासाअंती आढळून आलं. त्यावरून कटाचे सूत्रधार म्हणून सावरकरांना लंडनमधे अटक करण्यात आली.

सावरकरांवरील खटला सुरुवातीला इंग्लंडमधे तीनेक महिने चालला. मग खटल्याचं उरलेलं कामकाज हिंदुस्थानात चालवायचं ठरलं आणि १९१० सालच्या १ जुलैला सावरकरांना 'मोरिया' या बोटीवरून गुप्तपणे, कडक बंदोबस्तानं हिंदुस्थानकडं नेण्यात येऊ लागलं. वाटेत बोट फ्रान्सच्या मार्सेलिस बंदरात थोडावेळ उभी राहिली. ही संधी साधून सावरकरांनी धाडस करण्याचं ठरवलं. शौचासाठी म्हणून ते शौचकूपात गेले, आणि तिथल्या पोर्टहोल म्हटल्या जाणाऱ्या गोलसर भोकातून त्यांनी बाहेरच्या समुद्रात गुपचूप उडी घेतली. या धडपडीत त्यांच्या अंगाची सालडी निघाली. पण दुखापतीकडं दुर्लक्ष करून ते अर्ध्या मैलावरील धक्क्याकडं पोहत जाऊ लागले.



सावरकर पोर्टहोलमधून निसटून पोहत धक्क्याकडं चालले आहेत, असं दृष्टोत्पत्तीस येताच बोटीवरच्या रक्षकांनी त्यांच्यावर सटासट गोळ्या झाडल्या. पण त्या शिताफीनं चुकवीत त्यांनी शेवटी धक्का गाठलाच. धावतच जाऊन त्यांनी एका फ्रेंच अधिकाऱ्याला गाठलं. तेवढ्यात त्यांचा पाठलाग करीत आलेला ब्रिटिश अधिकारी तिथं येऊन ठेपला. आणि, "फ्रेंच भूमीवर त्याला मला अटक करू देऊ नका" अशी विनंती त्यांनी त्या फ्रेंच अधिकाऱ्याला करूनसुद्धा ती न मानता त्या फ्रेंच अधिकाऱ्यानं त्यांना खुशाल ब्रिटिश अधिकाऱ्याच्या ताब्यात दिलं. सावरकर पुन्हा ब्रिटिशांचे कैदी बनले.

त्यांना भारतात आणल्यावर जॅक्सन खून कटाचे सूत्रधार म्हणून त्यांच्यावर खटला पुढं चालू झाला. शेवटी त्यांना दोन जन्मठेपींची—तब्बल पन्नास वर्षांच्या काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावली गेली.

सावरकरांची जिद्द व चिकाटी दांडगी होती. अंदमानच्या कोठडीत सक्तमजुरीची शिक्षा भोगतानासुद्धा 'कमला' हे सुरम्य दीर्घकाव्य त्यांना स्फुरलं. एवढंच नव्हे, तर ते लिहून काढायला कागद-लेखणी मिळण्यासारखी नसल्यानं, घायपाताच्या काट्यानं किंवा टोकदार दगडानं त्यांनी त्याच्या ओली भिंतीवर क्रमाक्रमानं लिहिल्या व त्या तोंडपाठ केल्या. हा प्रकार उघडकीस येताच त्यांना हातकडीत टांगूनही ठेवण्यात

आलं होतं.

त्यांच्या शिक्षेविरुद्ध देशात खूपच काहूर माजलं, तेव्हा काही लोकांच्या खटपटीमुळं इंग्रज सरकारनं त्यांना १९२१ साली हिंदुस्थानात आणलं. नंतर १९२४ सालच्या जानेवारीत त्यांची सुटका होऊन त्यांना रत्नागिरी शहरात काही अटींवर स्थानबद्ध करून ठेवण्यात आलं. पाच वर्षं त्यांनी राजकीय चळवळीत भाग घ्यायचा नाही, आणि रत्नागिरी जिल्ह्याबाहेर जायचं नाही, असा दंडक या मुदतीत घालण्यात आला होता. पण या अवधीत त्यांनी चिकाटीनं समाजसुधारणेचं कार्य केलं.

पुढं १९३७ सालच्या मे महिन्यात, काँग्रेसची प्रांतिक सरकारं मर्यादित राज्यकारभार पाहू लागली, तेव्हा त्यांची बिनशर्त सुटका झाली. त्यानंतर त्यांनी आत्मवृत्तपर व इतिहासपर असं खूप लेखन केलं. ‘किर्लोस्कर’ सारख्या मासिकातून त्यांनी समाजसुधारणेवरचे लेख व ‘काळे पाणी’ यांसारख्या कादंबऱ्या प्रसिद्ध केल्या.

शेवटी काही दिवस अन्न व पाणीही वर्ज्य करून त्यांनी १९६६ सालच्या फेब्रुवारीत, दि. २६ रोजी देहत्याग केला.

## १० ब्रह्मदत्ताचा सोबती

एका गावात ब्रह्मदत्त नावाचा ब्राह्मण राहत होता. एकदा काही कामाकरता तो परगावी जावयाला निघाला तेव्हा त्याची आई त्याला म्हणाली, “बाळा, अगदी एकटाच कसा रे चाललास? कोणीतरी सोबतीला घे ना बरोबर.”

ब्राह्मण म्हणाला, “आई, भिण्याचे कारण नाही. रस्त्यात काहीच धोका नाही. जरुरीचे काम आहे. म्हणून एकटाच निघालो आहे.”

एकट्यानेच जाण्याचा त्याचा निश्चय आहे, असे पाहून जवळ-च्याच विहिरीतून त्याच्या आईने एक खेकडा आणला आणि ती म्हणाली, “बाळा, तुला जाणें आवश्यकच असले, तर हा खेकडाच तुला सोबत


करील. त्याला घेऊन तू जा."

आईच्या म्हणण्याप्रमाणे त्याने तो खेकडा ओंजळीत घेतला आणि कापराच्या पुडीत गुंडाळून ती पुडी भांड्यात ठेवली, आणि सामान घेऊन तो लगेच निघाला.

ग्रीष्म ऋतूतील कडक उन्हामुळे तो तापला आणि रस्त्यातील एका झाडाजवळ जाऊन त्या सावलीत झोपला. इतक्यात झाडाच्या ढोलीतून साप बाहेर पडला आणि त्याच्याजवळ आला. तेथे त्याला कापराचा वास आला. कापराचा सुगंध सापाला निसर्गतःच फार आवडतो. म्हणून त्यानें गाठोड्याचे कापड फाडले आणि तो ती कापराची पुडी आधाशाप्रमाणे खाऊ लागला. खेकडा त्या पुडीतच होता. त्याने त्या सापाला नांग्यांनी मारून टाकले.

ब्राह्मण काही वेळाने जागा झाला. तेव्हा त्याला शेजारीच कापराच्या पुडीजवळ काळा साप मरून पडलेला दिसला.

हे पाहून त्यानें मनात विचार केला, "या खेकड्यानेंच सापाला मारले असावे." असा विचार करून तो प्रसन्न होऊन म्हणाला, "मनुष्यानें एकटे जाऊ नये. कोणीतरी सोबतीला घ्यावे, असे माझ्या आईने सांगितले ते अगदी खरे आहे. मी तिच्या बोलण्यावर श्रद्धा ठेवली आणि त्याप्रमाणे वागलो म्हणूनच या खेकड्याने सापापासून माझे प्राण रक्षण केले. म्हणतातच की, चंद्र क्षीण झाल्यावर अमावास्येला सूर्याच्या आश्रयाला जातो व पुढे कला वाढल्या की पौर्णिमेला सागराला भरती आणतो. आपत्तीत ज्या धनवंताचे साह्य व मैत्री असते ती विसरून उत्कर्षाच्यावेळी मनुष्य नवेच मित्र करतो. तसेच हे.



म. ... वाचनालय शाखा.
वा, क्र.......
विषय क्र...........

## ११ जया एकादशीची कथा

माघ शु० ११ या तिथीला जया एकादशी म्हणतात. उपवास, विष्णुपूजा, इ. एकादशीची कृत्यं या दिवशी करतात. या व्रताची कथा अशी आहे–

माल्यवान व पुष्पदंती ही गंधर्वातली दोघं एकमेकांच्या प्रेमात पडली होती. एकदा इंद्राच्या दरबारात नृत्य करीत असताना पुष्पदंती चोरून माल्यवानाकडं पाहू लागली. त्या विक्षेपानं तिचं पाऊल चुकलं. साथ करायला बसलेल्या माल्यवानाचंही तिच्याकडं लक्ष गेल्यानं त्याचाही ताल चुकला. त्यामुळं नृत्याचा बेरंग झाला. तेव्हा संतापून इंद्रानं त्यांना शाप दिला– 'तुम्ही पिशाच्चयोनीत जाल.' त्याप्रमाणं ती दोघं पिशाच्च होऊन हिमालयात भटकू लागली. एके दिवशी त्यांचं भांडण झालं म्हणून रुसून ती जेवली नाही. मनं बेचैन झाल्यामुळं त्या रात्री त्यांना जागरणही घडलं: तो दिवस होता जयाएकादशीचा, त्यांच्या हातून नकळत तिचं व्रत घडलं. त्याचं फल म्हणून ती दोघं शापातून मुक्त झाली आणि परत स्वर्गात गेली. दोघांचं एकमेकांवरचं प्रेम ओळखून इंद्रानं मग त्यांच्या लग्नाला संमती दिली.

माघ शुद्ध एकादशीला षट्‌तिला एकादशीही म्हणतात. या व्रता-साठी उपवासाखेरीज तिलयुक्त षट्‌कृत्यं करायची असतात. (पौष वद्य एकादशीलाही हे व्रत करतात.) या व्रताची कथा अशी–

प्राचीन काळी एका ब्राह्मणीनं बरीच व्रतं करून पुण्य जोडलं होतं. अन्नदानाची मात्र तिनं उपेक्षा केली होती. एकदा खुद्द नारदमुनी भिकारी बनून तिच्याकडं भीक मागायला आले. तेव्हा तिनं त्याला झिडकारलं. एवढंच नव्हे, तर तुच्छतेनं त्याच्या हातातल्या भांड्यात तिनं बेधडक मातीचं ढेकूळ टाकलं.

पुढं मेल्यानंतर इतर व्रतांच्या पुण्याईमुळं तिला स्वर्गलोक लाभला. तिथं राहायला चांगलं घरही तिच्या वाट्याला आलं, पण त्या घरात धान्याचा लवलेश नव्हता. नारद भेटला, त्याच्याकडं तिनं याबाबत तक्रार केली. तेव्हा नारदानं तिला रोखठोक उत्तर दिलं, "मृत्युलोकी

असताना अन्नदानाची उपेक्षा केलीस, त्याचंच हे फळ. देवस्त्रियांना विचारून षट्तिला एकादशीच्या व्रताची माहिती करून घे आणि ते व्रत कर. म्हणजे तुझा कार्यभाग होईल." ते व्रत तिनं केलं, तेव्हा तिला कुठल्याच स्वर्गसुखाची वाण पडली नाही.

## १२ संकष्टचतुर्थी व्रताची कथा

प्राचीन काळी साम नावाचा अंत्यज वाटमारी करून पोट भरायचा. यापायी त्यानं एकूण बारा ब्राह्मणांची हत्या केली होती. एकदा दिवसभर दबा धरून बसूनही त्याला वाटमारी साधली नाही. त्यामुळं त्याला चक्क उपास घडला. रात्री चंद्रोदयानंतर तो घरी परतला. घराचं दार उघडण्यासाठी गणेश नावाच्या आपल्या मुलाला कितीतरी हाका मारल्या. मग त्यानं बायकोमुलासह जेवण उरकलं. त्या दिवशी होती संकष्टचतुर्थी. नकळत का होईना, त्याच्या हातून उपास घडला, त्याचप्रमाणे गणेशाच्या नावाचा पुनःपुन्हा उच्चारही त्याच्या तोंडून झाला. अभावितपणे पाळल्या गेलेल्या या संकष्टचतुर्थीमुळे पुण्य लाभून मरणानंतर त्याला स्वर्गलोक लाभला; एवढेच नव्हे, तर पुढल्या जन्मी कृतवीर्य नावाचा राजा होण्याचे भाग्यही लाभले. आधल्या जन्मीच्या वाटमारीच्या उद्योगात त्याने ब्रह्महत्या केली होती, म्हणून राजाच्या या जन्मात त्याला मूलबाळ होईना. मग त्याने संकष्टचतुर्थीचे व्रत आचरले, तेव्हा त्याला मुले झाली.

प्रत्येक महिन्याच्या वद्य चतुर्थीला संकष्टचतुर्थी म्हणतात. ही संकष्टी मगळवारी येते, तेव्हा तिला अंगारकी म्हणतात. तिचे महत्त्व विशेष मानले जाते. माघातल्या अशा एखाद्या अंगारकी चतुर्थीला सकष्टचतुर्थी व्रत सुरू करावे व ते वर्षभर आचरून मग त्याचे उद्यापन करावे, असे सांगितले आहे. त्याखालोखाल श्रावण वद्य चतुर्थीला हे त सुरू करण्याची प्रथा आहे.

# १३ सीताकुंड

बिहारमध्ये मोंघीरनजीक सीताकुंड नावाचं गाव असून तिथं गरम पाण्याचा झरा असलेलं सीताकुंड आहे. या कुंडाचा रामायणातील पुढील घटनेशी संबंध असल्याचं सांगतात–

रावणाच्या बंदिवासातून सुटल्यावर सीतेनं अग्निदिव्य करून आपलं सच्छिल चारित्र्य सिद्ध केलं, पण त्यावेळी तिचं अंग तापून निघालं होतं. तेव्हा तापलेल्या देहाला थंडावा आणण्यासाठी तिनं इथं येऊन या कुंडात स्नान केलं. तेव्हापासून या कुंडातलं पाणी उष्ण झालं.

या कुंडातलं पाणी वर्षातून आठ महिने खूप उष्ण असतं. उन्हाळ्यात, विशेषतः रामनवमीच्या दिवशी मात्र ते कोमट होतं, असं म्हणतात. माघी पौर्णिमेच्या निमित्तानं इथं स्नान करण्यासाठी मोठी यात्रा भरते.

सीताकुंडासंबंधीची आणखी एक दंतकथा अशी आहे–

सीतेचा रहिवास रावणाकडं झाला, म्हणून मोंघीर (प्राचीन काळचं मुंगेर) भागातले ऋषी तिच्या हातचं अन्न घेईनात. म्हणून संतापून जाऊन सीतेनं धरणीमातेला दुभंग व्हायची प्रार्थना केली. तशी ती दुभंग होताच सीता धरणीच्या पोटात गडप झाली. पण मारुतीनं प्रार्थना करून तिला पुन्हा वर यायला भाग पाडलं सीता वर आली, तरी दुभंगलेली जमीन मात्र तशीच राहिली. मग तिथं हे कुंड बनलं. त्याला नाव पडलं सीताकुंड.

सीताकुंडाजवळच थंड पाण्याचं एक कुंड आहे, त्याला रामकुंड म्हणतात. लक्ष्मणकुंड, भरतकुंड व शत्रुघ्नकुंड अशी आणखी तीन साधी कुंडंही इथं आहेत.




# १४ बिलईमाता

रायपूर जिल्ह्यातल्या धामतरी या गावी बिलईमाता या देवीचं मंदिर आहे. भैना नावाच्या वन्यजमातीची ही देवी. त्या लोकांत या देवीबद्दलची दंतकथा प्रचलित आहे, ती अशी–

एकदा काही मुलं पाखरं मारायला म्हणून रानाकडं चालली होती. त्यांना वाटेत बिलाईमाता देवी लागली. तर ती मुलं त्या देवीला सहज गमतीनं नवस बोलली– "टोपलीभर पाखरं मिळाली, तर एक मुलगा बळी देऊ तुला."

पुढं ती रानात गेली आणि योग असा की, चक्क टोपलीभर पाखरं त्यांच्या हाती आली. घरी परतताना पुन्हा ती देवी वाटेत दिसली, तसा त्यांना जाताना तिला बोललेला नवस आठवला. आता काय करायचं? नवस फेडणार तरी कसा? तेव्हा एका धूर्त मुलानं डोकं लढवलं. हिकमतीनं वेळ मारून न्यायचं योजलं आणि देवीच्या पुढं आपली मान वाकवून गवताची काडी तलवारीसारखी मानेवर फिरवली. गवताच्या काडीनं जखमसुद्धा न होता नवस फेडल्यासारखं होईल, अशी त्याची कल्पना, पण विपरीत घडलं. मान चक्क कापली गेली अन् शिर जमिनीवर पडलं. हा दुर्दैवी चमत्कार पाहून मुलं आकांतून उठली, पण लौकरच सावरली आणि देवीला शरण जाऊन तिची करुणा भाकू लागली. मग देवीला त्यांची दया आली. त्यांच्यावर प्रसन्न होऊन तिनं त्या मेलेल्या मुलाला जिवंत केलं.

माघ महिन्यात या ठिकाणी यात्रा भरते.



## १५ शेतकऱ्याची सचोटी

पहिल्या महायुद्धातली गोष्ट. जर्मन घोडदळाची एक तुकडी शेजारच्या देशात लूट करण्यासाठी शिरली. जवळच्याच एका गावावर तिनं धाड घातली; पण फारसा काही लाग साधला नाही. तेव्हा निदान घोड्यांना दाणावैरण तरी मिळवण्याचा तुकडीच्या नायकानं बेत योजला. एका खोऱ्यात एका म्हाताऱ्याच्या झोपडीपाशी ते गेले. म्हाताऱ्यानं नायकाला लवून मुजरा केला. त्याला नाईक मिजाशीत बोलला, "म्हातारबाबा, आमच्या घोड्यांसाठी दाणावैरणीची लूट मिळेल असं एखादं शेत जवळपास कुठंतरी दाखवा पाहू." म्हातारा म्हणाला, "दाखवतो. चला माझ्याबरोबर." आणि त्यांचा वाटाड्या बनून तो त्यांना आपल्याबरोबर घेऊन चालला. लौकरच त्यांना सातूचं भरघोस पीक आलेलं शेत दिसलं. तेव्हा तुकडीचा नायक म्हणाला, "हे बरं आहे शेत. चांगलं खाद्य मिळेल आमच्या घोड्यांना." पण त्यांना थोपवून म्हातारा म्हणाला, "हे नको. थोडं पुढं जाऊ या आपण. जरा दम धरा. तुमचं काम होऊन जाईल."

अर्धा मैल अंतर ओलांडल्यावर त्यांना तसंच दुसरं एक शेत लागलं. त्या शेतातलं पीक हवं तेवढं कापून घ्यायला म्हाताऱ्यानं त्यांना सांगितलं. पुरेसं पीक कापून घेतल्यावर ती तुकडी माघारी निघाली. तेव्हा वाटेत पुन्हा ते पहिलं शेत लागलं. त्याच्याकडं हात दाखवीत नायकाने विचारले, "म्हातारबाबा, हे पीक जवळ असताना आम्हाला तुम्ही लांबवर जाऊन ते पीक घेण्याची एवढी तसदी का दिलीत ?"

म्हातारा लीनपणे उत्तरला, "साहेब, हे शेत जवळ होतं खरं, पण हे दुसऱ्याचं आहे. अन् तुम्ही कापलंत ते माझं स्वतःचं होतं. जाणून-बुजून दुसऱ्याची नुकसानी करणं योग्य वाटलं नाही मला. त्यापेक्षा स्वतःची हानी झालेली परवडली !"

# १६ त्रिवेणी घाट

बिहारात गंडकी, पंचनद व शोण या नद्यांचा संगम झाला असून तिथल्या घाटाला त्रिवेणी घाट म्हणतात. घाटाची एक बाजू नेपाळातील त्रिवेणी या गावाला भिडते, म्हणून याला त्रिवेणी घाट म्हणत असतील, नाहीतर त्रिवेणी संगमावरूनही तसं नाव पडलेलं असेल. त्रिवेणी संगमामुळं हे तीर्थस्थान मानलं गेलं असून माघ महिन्यात इथं मोठी यात्रा भरते. हजारो भाविक या संगमात स्नान करतात.

'भागवत' ग्रंथात गजेंद्रमोक्षाची जी कथा सांगितलेली आहे, ती या संगमाच्या ठिकाणी घडली, अशी इथल्या लोकांची समजूत आहे. हत्ती-मगरीच्या झटापटीची जागा म्हणून एके ठिकाणी हत्तीची व मगरीची पावलं उमटलेली दाखवतात. गजेंद्र मोक्षाची कथा अशी आहे –

प्राचीनकाळी इंद्रद्युम्न नावाचा राजा होता. त्यानं एकदा अगस्त्य ऋषीचा योग्य मान न ठेवल्यामुळं ऋषीनं त्याला 'तू गजयोनीत जन्म घेशील' असा शाप दिला. त्याप्रमाणं दुसऱ्या जन्मात तो हत्ती झाला. चित्रकूट पर्वतावर राहू लागला. तर एकदा तिथल्या एका तलावात हा डुबकत असताना मगरीनं त्याचा एक पाय आपल्या जबड्यात पकडला. पाय सोडवून घेण्यासाठी त्यानं प्रयत्नांची शिकस्त केली; पण त्याची सारी धडपड फुकट गेली. हताश होऊन शेवटी त्यानं विष्णूची प्रार्थना केली–करुणा भाकली. तेव्हा मग विष्णू धावून आला, आणि त्यानं मगरीच्या तावडीतून त्या गजाची सुटका केली. विष्णू प्रसन्न झाल्यानं गजयोनीतूनसुद्धा त्याला मुक्तता लाभली. गजेंद्रमोक्ष म्हणून हा प्रसंग ओळखला जातो.

शोण नदीच्या तीरावर सीतेचं मंदिर असून, लव-कुशांशी रामाचं युद्ध झालं, ते सीतेनं या ठिकाणी बसून पाहिलं, अशी आख्यायिका या मंदिराच्या जागेबद्दल सांगितली जाते.

□

## १७ रामदासनवमी

माघ व० ९: समर्थ रामदासांच्या पुण्यतिथीचा दिवस. १६८१ साली सज्जनगड इथं रामनामाचा त्रिवार घोष करून स्वामींनी आपला अवतार संपवला. सातार्‍याच्या पश्चिमेकडे ६ मैलांवर परळी गाव आहे, त्याच्याजवळ सज्जनगड हे स्थान आहे. तिथं रामदास स्वामींची समाधी आहे. बाजूच्या मठात रामदासांनी आपले अखेरचे दिवस घालवले. या मठाची जुनी वास्तू शिवाजी महाराजांनी बांधलेली आहे. तिथल्या शेजघरात रामदासांच्या विविध वस्तू जपून ठेवलेल्या आहेत.

मठाच्या उजवीकडं असलेल्या श्रीराम मंदिराच्या गाभार्‍यातून खाली समाधीकडं जायला भिंतीतील दगडी जिना आहे. तिथं पितळी पेटीत समर्थांच्या पादुका आहेत.

या गडावर दरसाल रामनवमीला मोठा उत्सव साजरा होतो. तो माघ वद्य प्रतिपदेपासून नवमीपर्यंत चालतो. या उत्सवात अर्धापाऊण लाख समर्थभक्त गडावर जमतात. अर्थात नवमीच्या मुख्य पुण्यतिथी-उत्सवाला विशेष गर्दी लोटते.

या गडाला प्रथम परळीचा गड म्हणत. पण पुढं समर्थ तिथं राहू लागल्यावर शिवाजीमहाराजांनी त्याला सज्जनगड हें नाव दिलं, व समर्थांसाठी तिथं मठ बांधून दिला.

ठोसरांच्या नारायणाला त्याची आई राणूबाई हिनं त्याच्या इच्छेविरुद्ध त्याचं लग्न लावून देण्यासाठी बोहल्यावर उभं केलं. तेव्हा पुरोहितांनी 'सुमुहूर्त सावधान' म्हणताक्षणी सावध होऊन नारायण घरातून पळून गेला. आपलं जांब गाव सोडून थेट नासिकजवळच्या टाकळी गावी त्यानं तपश्चर्या आरंभली. ती करताना त्यानं नाशिकक्षेत्री शास्त्री-पंडितांपाशी संस्कृत ग्रंथांचं अध्ययन केलं. 'श्रीराम जय राम जयजय राम' या मंत्राचा १३ कोटी जपही केला. लोक आता त्याला रामदास नावानं ओळखू लागले. अशा प्रकारे बारा वर्षं घालवल्या-वर रामदासांनी तीर्थयात्रा करण्यात आणखी बारा वर्षं घालवली. उत्तर भारतातील तीर्थयात्रेच्या वेळी रामदास हिमालयातल्या बदरी

केदार व बदरी नारायण या क्षेत्री गेले. या प्रवासात त्यांना ध्यानस्थ अवस्थेतल्या श्वेतमारुतीचं दर्शन घडलं. हिमालयाच्या या कडक थंडीच्या भागात रामदासांना गारठा खूप बाधू लागला. ती बाधा टाळण्यासाठी श्वेतमारुतीनं त्यांना टोप, वल्कलं व वस्त्रं दिली, तशीच जपमाळ, खडावा व कुबडीही दिली, असं सांगतात. पुढं रामदासांनी नेहमी हाच वेष धारण केला होता.

उत्तर-दक्षिणेची तीर्थयात्रा संपली, तेव्हा घर सोडून त्यांना चोवीस वर्षं झाली होती. तेव्हा घरी जाऊन आईला एकदा भेटावं अशी त्यांना इच्छा झाली. जांब गाव गाठून ते घरी जातात, तर आई अगदी म्हातारी होऊन भारी थकलेली त्यांना आढळली. लहानपणी ते घर सोडून गेल्यापासून त्याच्याबद्दल शोक करीत, रडत राहिल्यानं तिची दृष्टी हळूहळू मंद होऊन आता तिला दिसेनासं झालं होतं. रामदा तिच्या जवळ गेले आणि 'आई, मी तुझा नारायण आलोय' असं ते उद्गारले, तेव्हा तिनं त्याला मायेनं घट्ट मिठी मारली. तिची दृष्टी गेली आहे, असं समजताच त्यांनी तिच्या डोळ्यांच्या पापण्यांवरून हळुवारपणे आपला हात फिरवला त्याबरोबर तिला पुन्हा दृष्टी लाभली. हा चमत्कार पाहून ती थक्क झाली.

मग थोडे दिवस रामदासांनी आईच्या सहवासात घालवले. एकदा



त्यांनी तिला ‘भागवत’ ग्रंथातला काही भाग वाचून दाखवला व त्यावर निरूपण केलं. ते ऐकून आई समाधानानं उद्गारली–“नारायण, माझ्या पोटी जन्म घेऊन तू उद्धार केलास बाबा माझा. तुझी योग्यता आता कळली मला. आता तू मला सोडून गेलास तरी दुःख नाही होणार मला. जगाच्या उद्धारासाठी खुशाल कुठंही जा. ईश्वर तुला यश देईल !”

आईचा तो आशीर्वाद घेऊन मग रामदास समाजाचं कल्याण साधण्याच्या प्रेरणेनं घरातून निघाले. कृष्णानदीचा परिसर हे त्यांनी आपलं पहिलं कार्यक्षेत्र निवडलं. त्यांनी बलोपासनेच्या प्रचारासाठी एकूण अकरा मारुती स्थापन केले, त्यांतला पहिला कराडनजीकच्या शहपूरच्या डोंगरावर स्थापला. पुढं चाफळ खोरं निवडून ते कायमचे तिथंच राहू लागले. प्रपंच व परमार्थ यांचा बोध त्यांनी कीर्तना-प्रवचनांच्या द्वारे केला. त्यांना सर्व जातींचे स्त्री-पुरुष शिष्य लाभले. त्यात मुस्लिम फकीरही असायचे. कल्याण हा रामदासस्वामींचा पट्टशिष्य होता. स्त्रियांमध्ये अक्काबाई व वेणूबाई या प्रमुख होत्या.

## १८ धनुष्कोटी

भारताच्या दक्षिण टोकाजवळील रामेश्वर बेटाच्या अगदी दक्षिणेकडील टोकाशी धनुष्कोटी हे तीर्थस्थान आहे. माघ महिन्यात व आषाढात इथं स्नान करणं विशेष पुण्यदायक मानतात. हिंदी महासागर व बंगालचा उपसागर यांचा इथं संगम होतो. इथूनच रामानं लंकेपर्यंत सेतू बांधला होता, असं म्हणतात. रावणाचा संहार करून राम अयोध्येला परतू लागला, तेव्हा त्यानं तो सेतू मोडून टाकावा; नाहीतर कुणीतरी बलाढ्य भारतीय सम्राट त्याचा उपयोग करून लंकेवर स्वारी करतील, अशी भीती बिभीषणानं रामापाशी व्यक्त केली. म्हणून रामानं आपल्या धनुष्याच्या टोकानं (कोटी) तो सेतू मोडून सागरात बुडवून टाकला. त्यावरून या स्थानाला धनुष्कोटी नाव पडलं. आजही त्या जागी मोठाल्या पाषाणांची लांब रांग आढळते.

# १९ अमृतवाणी

चीनमधील एक लोककथा. कोण्या एके काळी एका मंदिरात मुख्य देवमूर्तीच्या समोरच्या दालनात मधला दर्शनाचा मार्ग सोडून दोन्ही अंगांना उभ्या दगडी कट्ट्यावर इतर देवांचे अनेक दगडी पुतळे उभे ठाकले होते. अन्नदेवता, अग्निदेवता, युद्धदेवता, मातृदेवता असे नाना प्रकार त्या पाषाण मूर्तींत होते. या सगळ्या मूर्ती एकाच आकाराच्या किंवा उंचीच्या नव्हत्या. कमी-अधिक उंचीच्या होत्या. त्यांच्या पायांशी भक्तांनी लावलेल्या मेणबत्त्यांचे जळून उरलेले तुकडे असायचे.

मंदिराची देखभाल पाहणाऱ्या भिक्षूंवर पडणारी सर्वांत कटकटीची कामगिरी म्हणजे मंदिराची झाडलोट. ही कामगिरी रोजची असे. हे झाडलोटीचं काम केवळ जमीन साफ करण्याचं नसे. तर ज्या कट्ट्यांवर देवदेवतांच्या मूर्ती उभ्या ठाकलेल्या असत ते कट्टेही साफसूफ करायचे असत. म्हणजे त्या मूर्तींच्या पावलांच्या जवळपासची चिंचोळ्या जागेतील धूळ साफ करावी लागे. अन् हेच काम भारी किचकट, जिकिरीचे असे. ते सांभाळून काळजीपूर्वक करावं लागे.

वैताग आणणारी ही कामगिरी नव्यानं आलेल्या सर्वांत धाकट्या भिक्षूकडे साहजिकच सोपवली जाई. ज्यावेळची ही गोष्ट आहे, त्यावेळी या मंदिरात असा भिक्षू होता चु युआन चँग नावाचा पोरगा.

हा पोरगा हे काम करायला लागून थोडे दिवस झाल्यावर इतर भिक्षूंच्या लक्षात आलं की, साफसुफीचं एकूण काम किचकट असूनही हा पोरगा ते झटपट उरकतो. एवढ्या झटपट ती साफसफाई आजवर कुणालाच उरकता आली नव्हती. त्यांना प्रश्न पडला, या नवीन पोराला हे कसं काय इतक्या जलदीनं साधतं ? ! तो कामचुकारपणा करतो किंवा काम नीटनेटकं करीत नाही, असेही म्हणता येईना. कारण त्यांच्या कामात काही दोष असेल, या शंकेनं, त्याच्या नकळत त्यांनी नीट न्याहाळून पाहिलं. तर पोराचं काम चोख होतं. त्यात कुठं काही कसूर आढळली नाही. उलट त्याच्या आधी होणाऱ्या कामाहून याचं काम अधिक सरस होतं. विशेषतः चबुतऱ्यावरच्या पाषाणमूर्तींची

पावलांलगतची किचकट साफसफाई लक्ष वेधून घेण्याइतकी निर्मळ केलेली दिसत होती. असं असूनही हा नवीन पोरगा एवढ्या झटपट ही कामगिरी साधतो तरी कशी ?

त्या सर्वांनी याबाबत आपसात बरीच चर्चा केल्यावर ठरवलं की, त्या पोरग्याच्या नकळत एकदा त्याच्या कामाची टेहळणी करायची आणि एके दिवशी त्यांच्यातल्या काहीजणांनी गुपचूप टेहळणी आरंभली, तर त्यांना काय दिसलं ?

तो पोरगा त्या चबुतऱ्यांवरील पुतळ्यांशी झाडू घेऊन आला अन् त्या देवदेवतांना मारे सलगीच्या स्वरात म्हणतो कसा– "हे बघा मंडळी, आता बऱ्या बोलानं थोडा वेळ खाली उतरा बरं ! तुमच्या पायाखालचा चबुतरा जरा साफ करून घेतो."

आणि मौज अशी की, उगाच लटकं कुरकुरत अन् मिस्किलपणे हसत ती सारी देवमंडळी चबुतऱ्यांवरून चक्क खाली उतरली. तेव्हा चुनं ते चबुतरे नीट साफ करून घेतले. मग तो देवमंडळींना म्हणाला, "हा ! मंडळी, आता जा पाहू परत आपापल्या जागेवर. खालची जमीन साफ करायचीय मला. उगाच मधे तुमचा अडथळा नको."

आणि ती सगळी देवमंडळी मुकाट्यानं जागी जाऊन उभी ठाकली. मग चुनं खालची जमीन झटकन् झाडून स्वच्छ केली.

हा चमत्कार पाहून, लपून राहिलेले टेहळे भिक्षू थक्क झाले. ते मुकाट्यानं पुढं झाले अन् चु युयान-चँगला त्यांनी आदरपूर्वक वंदन केलं. कारण त्यांना कळून चुकलं की, प्रत्यक्ष देवांना नाचवणारी त्याची वाणी अमृताची असली पाहिजे. भावी काळात तो खात्रीनं मोठ्या पदाला चढल्याखेरीज राहणार नाही, असा विश्वास त्यांना वाटला.

आणि त्यांचं भाकित खरं ठरलं. यु युआन चँग बादशहा झाल्यानंतरच हे जग सोडून गेला.

## २० घरजावयाला नामी आहेर

एका गावात एक गरीब शेतकरी मुलगा होता. त्यानं एका श्रीमंत शेतकऱ्याच्या एकुलत्या एक मुलीशी लग्न केलं, नि तो घरजावई बनून त्याच्याच घरी राहिला. शेजारच्या गावात त्या घरजावयाचा एक मित्र होता. त्याला एकदा तरी घरी जेवायला बोलवावं अशी याची खूप इच्छा होती. पण सासरा एवढा कवडीचुंबक होता, की, त्याच्या धाकामुळं आपल्या त्या मित्राला कधी जेवायला बोलावणं याला जमलं नव्हतं. त्यामुळं मनातून हा हिरमुसला होऊन राहिला होता.

नंतर काही दिवसांनी त्याचा सासरा मरण पावला आणि एकुलत्या एक मुलीचा नवरा म्हणून त्याच्या साऱ्या शेतवाडीचा हा घरजावई वारस बनला. सासू तर आधीच वारली होती. त्यामुळं आता केवळ नवरा-बायकोचा कारभार तेव्हा आपल्या त्या मित्राला घरी जेवायला बोलावण्याची ब-याच दिवसांची आपली इच्छा त्यानं पुरी करण्याचं योजलं आणि आपल्या मित्राला त्यानं अगत्यानं बोलावलं.

मित्र आल्यावर यजमान घरजावयानं त्याला आपल्या मालकीची अफाट शेतीवाडी, बागबागायत वगैरे ऐटीनं दाखवलं, पण गंमत अशी, की प्रत्यक्ष जेवणाच्या वेळी मात्र त्याच्या पाहुण्या मित्राला तुटपुंज्या जेवणावर कसंतरी कोरडं समाधान मानावं लागलं. ते भुक्कड जेवण पाहून, जेवताना मित्र खोचक नजरेनं त्याच्याकडे पाहत होता. त्याची बायको समोरच पुढ्यात असल्याने जेवणाबद्दल त्याला स्पष्ट काही बोलण्याचं मात्र मित्रानं टाळलं. अवांतर गप्पा करीत वेळ निभावून नेली.

यजमान घरजावईही मनातून शरमला होता. संकोचानं मित्राच्या डोळ्याला डोळा भिडवण्याचंही टाळीत होता. कारण आपल्या मित्राला एवढं आग्रहानं जेवायला बोलावलं असताना बायकोनं मेजवानी तर सोडाच, पण केलेले चार-दोन पदार्थही भरपूर वाढले नव्हते, पण घरजावयाची मख्ख बायको ती ! कवडीचुंबक बापाच्या करड्या तालमीत तयार झालेली. नाही तरी तो तिला वचकूनच असायचा. त्यामुळं

ओशाळा होऊन तो मित्राची नजर चुकवीत कसेबसे घास गिळीत होता.

झालं. एकदाचं जेवण आटोपलं. यजमानाबरोबर ओटीवर त्याचा मित्र पानतंबाखू खात बसला त्या वेळी मात्र ते दोघेच तिथं असल्यानं मित्रानं मिस्किलपणे त्याला म्हटलं–

" तू चांगलीच थट्टा केलेली दिसतेस माझी ! मोठी शेतीवाडी अन् बागायत खुशाल स्वतःची म्हणून मला दाखवलीस अं ? कमाल आहे तुझ्या दडपेगिरीची ! तुझ्या सांगण्यावरनं त्या वेळी माझा तसाच समज झाला होता, पण तू मला चक्क बनवलंस हे आता कळून चुकलं मला. नाहीतर भलताच गैरसमज डोक्यात घेऊन गेलो असतो मी."

" म्हणजे ?" यजमान घरजावई महाशय आश्चर्यानं उद्गारले,

" मी सांगितलं ते खोटं वाटलं की काय तुला ? अरे, शपथेवर सांगतो हवं तर– खरोखरीच माझ्या मालकीचं आहे, हे सारं. संशय का आला तुला ?"

" संशय कसला ?" मित्रानं रोखठोक सांगितलं, " तू आज घातलेल्या जेवणानं खात्रीच पटवली की ! जेव्हा ते तसं नि तेसुद्धा धड पोटभर नाही, म्हणून म्हणतो– तुझी एवढी मिळकत असती, तर मला मुद्दाम बोलावून आजच्यासारखं दरिद्री जेवण घातलंच नसतंस तू ! याहून काहीतरी सरस जेवण खात्रीनं मिळालं असतं मला, नाही का ? किमान चार जिन्नस पोटभर तरी मिळाले असते."

यजमानाची कद्रू बायको माजघराच्या दाराआड उभी होती. काहीशा लठ्ठ असलेल्या पाहुण्याकडं खोचून बघत ती उद्गारली, " जेवण मुद्दामच साधं नि बेताचं केलं होतं हो ! म्हटलं... उगाच अजीर्ण व्हायला नको. पक्वान्नं केली असती तर जास्त खायचा मोह होतो माणसाला. तसं होऊन प्रकृतीला काही अधिकउणं झालं असतं, तर तुमच्या घरी यांच्या वहिनीनं नावं ठेवली असती आम्हाला."

" अस्सं ! अस्सं !!" मित्र तिच्याकडे रोखून बघत रोखठोक पण मिस्किलपणे उत्तरला, " हे ठीक केलंत बाकी ! दूरदृष्टी असावी तर अशी ! पण यापेक्षा तुम्ही बोलाचीच कढी नि बोलाचाच भात वाढला असतात तर अधिक बरे झाले असते हो ! म्हणजे स्वयंपाक

करायची तसदी घेऊन जेवायला वाढलंत, तेवढंसुद्धा पचवायचा त्रास पोटाला झाला नसता. चक्क हवापाण्याच्या नि तुमच्या मुबलक मिळकतीच्या गप्पा मारून त्यावर तुडुंब पोट भरता आले असते, नाही का ? शिवाय उपवासाचे पुण्य लाभले असते ते निराळेच !"

## २१ घृष्णेश्वराची कथा

मराठवाड्यात वेरूळनजीक इलागंगेच्या काठाशी घृष्णेश्वराचे ज्योतिर्लिंग आहे. बारा ज्योतिर्लिंगांतल्या या देवस्थानाची कथा अशी आहे–

प्राचीन काळी सुधर्मा या ब्राह्मणाची सुदेहा नावाची पत्नी होती. बरीच वर्षं तिला मूल होईना. आपल्यापासून त्याला मूल होत नाही, म्हणून आपल्या भावाच्या घृष्णा नावाच्या मुलीशी त्याला लग्न करायला तिनं भाग पाडलं.

नवीन पत्नी घृष्णा शिवभक्त होती. रोज १०१ पार्थिव शिवलिंगे पुजून मग ती एका तलावात विसर्जित करायची. शंकराच्या कृपेने तिला मुलगा झाला. तेव्हा सुदेहाला तिचा मत्सर वाटू लागला. त्यापायी तिने एके दिवशी घृष्णेच्या मुलाला गुपचूप मारून टाकले आणि त्याचे तुकडे तुकडे करून ते तलावात नेऊन फेकले.

शिवलिंगांच्या पूजेत मग्न असताना घृष्णेला पुत्रहत्येबद्दल कळले. पण ती पूजा सोडून जागची उठली नाही. पूजा रीतसर पुरी करून तिने नेहमीप्रमाणे तलावात शिवलिंगाचे विसर्जन केले. तर त्याच वेळी एकीकडे तिचा मुलगा तलावातून जिवंतपणे बाहेर आला. तर दुसरीकडे शिव तिच्यासमोर प्रकट झाला. तो प्रसन्न होऊन म्हणाला, " वर मागून घे." शंकराने या क्षेत्रातच कायमचे राहावे, असा वर तिने मागितला. तिची इच्छा पुरी करण्यासाठी ज्योतिर्लिंगाच्या रूपात शंकर तिथे वास्तव्य करून राहू लागला. घृष्णेच्या शिवभक्तीचे हे फल असल्याने

या देवस्थानाला घृष्णेश्वर नाव पडले.

या घृष्णेश्वरासंबंधीची दुसरी कथा अशी आहे–

एकदा पार्वतीबरोबरच्या सारीपाटाच्या खेळात शिव हरला. म्हणून तो उदास होऊन काम्यवनात निघून गेला. तेव्हा पार्वतीही भिल्लीणीच्या वेषात तिकडं गेली. शिव एके ठिकाणी उदास मनाने बसलेला पाहून ती त्याच्यासमोर भिल्लनृत्य करायला लागली. तिचं ते रूप पाहून शिव तिच्यावर भाळला. त्याची व्हायला ती तयार झाली; पण पार्वतीवरचा राग त्यानं सोडावा आणि तिच्याबरोबर त्यानं काम्यवनातच राहावं, अशा दोन अटी तिनं घातल्या. दोन्ही अटी मान्य करून शिवानं तिला मिठीत घेतलं. तर भिल्लीणीचं रूप नाहीसं होऊन प्रत्यक्ष पार्वती त्याच्या मिठीत आलेली आहे, असं त्याला आढळून आलं. तो चकित झाला, तसा तिच्यावर खूषही झाला. नृत्य करून ती थकलेली असून तिला तहान लागली आहे, हे पाहून शिवानं आपला त्रिशूळ जमिनीत खुपसला. त्यासरशी पातळातली भोगावतीची जलधारा वर उसळली. तेच शिवालय तीर्थ.

त्यानंतर एके दिवशी पार्वती कपाळावर केशराचा टिळा लावण्यासाठी डाव्या तळहातावर उजव्या हाताच्या बोटानं केशर मळू लागली. तर त्या घर्षणातून एक शिवलिंग आकाराला आलं. घर्षणातून निर्माण झाल्यानं त्याला घृष्णेश्वर म्हटलं जाऊ लागलं.

घृष्णेश्वराचं मंदिर भव्य व कोरीव चित्रांनी सजलेलं आहे. मंदिरालगतच्या तलावाला शिवालयतीर्थ म्हणतात. प्राचीन काळी एल नावाच्या राजाचा कुष्टरोग या तीर्थात स्नान केल्यानं नाहीसा झाला, असं सांगणारी एक कथा आहे.

महाशिवरात्रीला इथं यात्रा भरते, तेव्हा घृष्णेश्वराची उत्सवमूर्ती पालखीतून मिरवत वाजतगाजत शिवालयतीर्थावर स्नानासाठी नेतात.

# २२ शिवरात्रीची गोष्ट

एक व्याध होता. तो शिकारीवर आपला चरितार्थ चालवायचा. त्या कमाईत त्याचा घरखर्च भागायचा नाही. यामुळं काही दुकानदारांचं त्याला कर्ज झालं. ते फेडून होईना म्हणून त्यांनी त्याला एका शिवमंदिरात बांधून ठेवलं. तो दिवस होता शिवरात्रीचा. शिवशिव म्हणत तो दिवस त्यानं उपवाशी राहून काढला. संध्याकाळी त्याची सुटका झाली. मग तो धनुष्यबाण घेऊन रानात शिकारीला गेला. रात्री एका तळ्याजवळ एका झाडावर शिकारीसाठी दबा धरून बसला. तळ्यावर पाणी प्यायला हरणांचा कळप आला. व्याध ज्या झाडावर बसला होता, ते झाड होतं बेलाचं. खालचं सावज नीट दिसावं म्हणून व्याधानं आपल्या डोळ्यांसमोरची बेलपत्रं खुडून टाकली. ती झाडाखाली असलेल्या पुरातन शिवलिंगावर पडली. खाली पडणाऱ्या पानांवरून हरणांना शिकाऱ्याचा सुगावा लागला व ती पळून गेली. सावजाची वाट बघत व्याध रात्रभर जागा राहिला. अखेर पहाटेला एक हरीण व दोन हरिणी तिथं आल्या. व्याध झाडावरून आपणावर बाण सोडीत असल्याचं त्यांनी हेरलं. तेव्हा हरिणींनी घाबरून त्या व्याधाला मनुष्यवाणीनं आर्जवलं : "तू आत्ताच आम्हाला मारू नकोस. घरी जाऊन आम्ही आमच्या पाडसांना शेवटचं पाजून येतो. परत आल्यावर आम्हाला तू खुशाल मार." व्याधाला तो प्रकार नवलाचा वाटला. त्या हरिणांना त्यानं जाऊ दिलं–

कबूल केल्याप्रमाणं सकाळी त्या हरिणी तर व्याधाकडं परत आल्याच, शिवाय त्यांच्याबरोबर त्यांची पाडसंपण आली. ती सारीजणं 'मला मार; बाकीच्यांना सोडून दे,' असं व्याधाला विनवू लागली. इतरांसाठी स्वत:चा बळी देण्यास तयार झालेली ती हरणं पाहून व्याधाचं काळीज गलबललं, "तुम्ही सगळीच्या सगळी खुशाल जा. यापुढं मी हरणांची हत्या करणार नाही." अशाप्रकारं त्यांना अभय देऊन व्याधानं आपलं धनुष्य मोडून टाकलं आणि तो तडक निघून गेला. पण रात्रभरच्या त्या एकूण वेळात व्याधाला उपवास, जागरण व शिवपूजा

आपोआप घडली. त्याच्या हातून शिवरात्रीचं व्रत घडलं. त्यामुळं देवदूतांनी विमान आणून त्याला, त्याच्या कुटुंबासह स्वर्गात नेलं.

आजही तो व्याध आणि कळपाचा म्होरक्या मृग हे दोघे नक्षत्रांच्या रूपानं आकाशात झळकत असलेले दिसतात.

## २१ शिवलीला

मिथिला नगरीत सुधन्वा नावाचा ब्राह्मण राहत होता. त्याला शिकारीचा छंद होता. एकदा तो शिकारीला रानात गेला, तर दिवसभर रान धुंडाळूनही त्याला शिकार मिळाली नाही. उपास मात्र घडला. चिकाटीनं तो रात्रीही रानात राहिला. तर अचानक एक वाघ त्याच्यावर चालून आला. ऐनवेळी गडबडून जाऊन तो जीव घेऊन पळत सुटला. वाघ त्याच्या मागं लागला. वाटेत एक सोयीस्कर आंब्याचं झाड त्याला आढळलं, त्याच्यावर चढून तो उंचशा फांदीवर जाऊन बसला. पण




वाघानं चिकाटी सोडली नाही. तो त्या झाडाच्या बुंध्याशी ठाण मांडून बसला. वाघाची हालचाल नीट दिसावी म्हणून आपल्या डोळ्यांपुढचा आंब्याचा मोहर खुडून खाली फेकला. त्या झाडाखाली होतं एक जुनं-पुराणं शिवलिंग. तर ब्राह्मणानं खाली टाकलेला आंब्याचा मोहर थेट त्यावर जाऊन पडला. अशा स्थितीत ती रात्र संपली. पण उजाडलं, तरी वाघ झाडाखालून काही हलेना. तेव्हा ब्राह्मणानं विचार केला की, आपण उपासपोटी झाडावरच बसून राहिलो, तर उपासमारीनं मरून जाणार. त्यापेक्षा वाघाचं भक्ष्य होऊन त्याची एक वेळची भूक भागवली, तर तेवढं पुण्य तरी आपल्याला लागेल. म्हणून तो झाडावरून खाली उतरला, आणि वाघाला बोलला : " मला खाऊन तू उपासाचं पारणं कर."

नवल असं की, रात्रभर शिवलिंगापाशी बसून राहिल्यानं त्या वाघाची हिंस्र वृत्ती पालटली होती. त्यामुळं ब्राह्मणाला अभय देत तो म्हणाला : " मी तुला काहीएक अपाय करणार नाही. तू खुशाल घरी जा."

अशाप्रकारे ब्राह्मण व वाघ या दोघांच्याही हातून अभावितपणे शिवरात्रीचं व्रत घडलं. त्या पुण्याच्या प्रभावानं ते दोघेही शिवलोकाला गेले. शिवानं मग त्या ब्राह्मणाला चंड या नावानं व वाघाला निकुंभ म्हणून आपल्या गणांत सामील करून घेतलं. त्या दिवसापासून शिव व्याघ्रचर्मही अंगावर धारण करू लागला.

भारतातल्या असंख्य शिवस्थानांच्या ठिकाणी महाशिवरात्रीला कमी-अधिक मोठ्या यात्रा भरतात.



१८६३ २८।२।८५

## २४ लेपाक्षीची कथा

आंध्र प्रदेशातील अनंतपूर जिल्ह्यात लेपाक्षी नावाचं कलाक्षेत्र आहे. इथं कर्मशैल या टेकडीवर वीरभद्राचं प्रसिद्ध मंदिर आहे. या गावच्या लेपाक्षी नावासंबंधीची अशी आख्यायिका रूढ आहे–

विजयनगरच्या कृष्णदेवरायाचा विरुपण्ण नावाचा कोषाध्यक्ष होता. वीरभद्राची मूर्ती जेथे सापडली, तिथं त्यानं मंदिर बांधलं. या बांधकामासाठी त्यानं एवढा पैसा खर्च केला की, त्यापायी राजाचा खजिना पार रिकामा झाला. ही गोष्ट कळताच राजा संतापला. त्या भरात त्यानं विरुपण्णाचे डोळे काढायला फर्मावलं. त्याबरोबर खुद्द विरुपण्णानं आपले डोळे कल्याणमंडपालगतच्या भिंतीवर घासले. या घर्षणाच्या खुणा त्या भिंतीवर उमटलेल्या अजूनही दाखवतात. या घटनेला अनुलक्षून लेप + अक्षी म्हणजे 'अंध डोळ्यांचं गाव' असं नाव प्रचलित झालं.

वीरभद्राच्या मंदिरापुढील नाट्यमंडपाला नक्षीदार असे ६६ स्तंभ आहेत. मंदिराच्या पूर्वेकडं ६०० फूट अंतरावर अखंड पाषाणातून खोद-लेला प्रचंड नंदी असून तो भारतातला सर्वांत मोठा नंदी गणला जातो. २० फूट उंच व ३० फूट लांब एवढा त्याचा भव्य आकार आहे.

महाशिवरात्रीला इथं मोठी यात्रा भरते.

## २५ रामेश्वराची कथा

भारताच्या दक्षिण टोकाशी रामानं स्थापलेलं शिवलिंग रामेश्वर म्हणून प्रख्यात आहे. बारा ज्योतिर्लिंगांपैकी हे एक असून शिवाय चार धामांतलं हे दक्षिण-धाम आहे. तीर्थयात्रेच्या दृष्टीनं उत्तरेतल्या काशी-क्षेत्राशी या सोमेश्वरक्षेत्राची सांगड घातली गेलेली आहे. एवढं याचं माहात्म्य मानलं गेलेलं आहे. या शिवलिंगाची कथा अशी आहे–

लंकेत रावणाचा वध केल्यावर राम गंधमादन पर्वतावर काही

दिवस विश्रांती घेत राहिला. त्यावेळी अगस्त्य आदी ऋषी-मुनींनी भेट घेऊन त्याचं स्वागत केलं. पण रावणाचा निःपात करूनही रामाच्या चेहऱ्यावर त्यांना खिन्नतेची छटा दिसली. या खिन्नतेचं कारण विचारलं असता रामानं सांगितलं की, रावणाचं पारिपत्य केलं हे एकपरी योग्य झालं असलं, तरी रावणाची हत्या म्हणजे एका ब्राह्मणाची हत्या— म्हणजेच ब्रह्महत्या आपल्या हातून घडली, याची बोच लागून राहिलीय.

तेव्हा ब्रह्महत्येच्या पातकाचं निवारण करण्यासाठी सागराच्या तीरावर शिवलिंग स्थापन करण्याचा सल्ला अगस्त्य मुनींनी रामाला दिला. ज्येष्ठ शुद्ध दशमीचा मुहूर्त त्यासाठी चांगला असल्याचंही त्यांनी सांगितलं, तेव्हा रामानं कैलासाहून दिव्य शिवलिंग आणण्याची कामगिरी मारुतीवर सोपवली, पण कैलासावर गेल्यानंतर शंकराची भेट काही मारुतीला होईना. शेवटी तप करून त्याला शंकराला प्रसन्न करून घ्यावं लागलं. मग मात्र त्यानं मारुतीला दिव्य लिंग दिलं. पण तोवर वेळ बराच निघून गेल्यानं मुहूर्ताची वेळ येऊन ठेपली, तरी मारुती लिंग घेऊन परतू शकला नाही. म्हणून सीता पुढं सरसावली. तिनं एक वालुकामय लिंग बनवलं. आणि मुहूर्त साधण्यासाठी, ऋषींच्या सल्ल्यानुसार रामानं मग तेच लिंग स्थापन केलं. रामेश्वर लिंग ते हेच.



रामेश्वराच्या टापूतील लोक याचा 'रामनाथलिंग' असा उल्लेख करतात.

मागाहून मारुती कैलासावरचं शिवलिंग घेऊन परतला, तेव्हा, आधी स्थापन केलेल्या लिंगाशेजारीच ते लिंग स्थापन करायला रामानं त्याला सांगितलं. मारुतीनं स्थापन केलेल्या लिंगाला काशीविश्वनाथ किंवा हनुमदीश्वर या नावानं ओळखलं जातं. रामेश्वरच्या यात्रेचं फल मिळण्यासाठी या दोन्ही शिवलिंगांचं दर्शन घेणं आवश्यक मानलेलं आहे.

अकरा मैल लांब व सात मैल रुंद असलेल्या बेटावर पूर्वेच्या बाजूला रामेश्वराचं देवस्थान आहे. तिथल्या लक्ष्मणतीर्थात स्नान केल्या-वरच यात्रेकरू देवदर्शनाला जातात. रामेश्वराएवढं भव्य मंदिर भार-तात दुसरं नाही. मंदिरातली दालनं एवढी उंच आहेत, की, देवाची उत्सवमूर्ती मिरवणुकीनं निघते, तेव्हा अंबारीसह इथून हत्ती चालला, तरी छताच्या हंड्या-झुंबरांना त्याचा बिलकुल धक्का लागत नाही. चारशे फूट लांबीची अशी तीन दालनं असून उंच धिप्पाड स्तंभांच्या रांगांनी ती विभागलेली आहेत. या दालनांच्या घडणीसाठी वापरलेल्या कित्येक शिळा तब्बल ४० फूट लांब आहेत. मंदिरात एकूण २२ तीर्थं आहेत.

ज्या दालनात रामेश्वरलिंग आहे, त्याच्या समोर १३ फूट उंच, ८ फूट लांब व ९ फूट रुंद एवढ्या आकाराचा नंदी आहे. शिव व पार्वती यांच्या उत्सवमूर्ती तर सोन्याच्या आहेतच, शिवाय ज्या हत्ती-वरून त्यांची मिरवणूक निघते तो सुद्धा सोन्याचा आहे.

इथला सर्वांत मोठा उत्सव असतो महाशिवरात्रीचा. तो दहा दिवस चालतो आणि रोजची उत्सवमूर्तीची मिरवणूक वेगवेगळ्या वाह-नांच्या साहाय्यानं निघते.

## २६ श्रीसप्तकोटीश्वर

गोमंतकात डिचोलीजवळ नारवे या गावी सप्तकोटीश्वर देवस्थान आहे. सारस्वत ब्राह्मणांची ही देवता गोमंतकातल्या कदंबांनी आपली उपास्यदेवता बनवली होती. या देवस्थानाची हकीगत अशी आहे–

सप्तकोटीश्वराचं देवालय पूर्वीच्या काळी दीपवती (हल्लीचं दिवाडी) या बेटावर होतं. चौदाव्या शतकात जुलमी मुसलमान आक्रमकांनी याचा विध्वंस केला. विजयनगरच्या कारकीर्दीत पंधराव्या शतकात, माधव मंत्री यानं याचा जीर्णोद्धार केला. नंतर या भागात पोर्तुगीज राजवट आली. तिनं पुन्हा हे देवालय नष्ट केलं. पण भक्तांनी चलाखी करून इथलं शिवलिंग नारवे या गावी नेण्यात यश मिळवलं आणि तिथं नव्यानं देऊळ उभारण्यात आलं. पुढं १६६७-६८ साली छत्रपती शिवाजीमहाराज गोमंतकाच्या मोहिमेवर गेले. तेव्हा डिचोली इथल्या मुक्कामात त्यांनी जवळपास शिवमंदिर कुठं आहे, म्हणून चौकशी केली. नारवे इथं सप्तकोटीश्वराचं शिवस्थान असल्याचं समजताच ते तिकडं गेले. त्यावेळी गाभाऱ्यात पूजा चालू होती, म्हणून महाराज बाहेर उभे राहिले. तर वरच्या लव्हाळ्यांच्या छपरातून एक लव्हाळं महाराजांच्या समोर खाली पडलं. तोच परमेश्वराचा दृष्टांत मानून महाराजांनी त्या देवालयाचा जीर्णोद्धार करायला आपल्या कारभाऱ्याला सांगितलं. त्याप्रमाणे ते काम लौकरच पूर्ण झालं.

महाशिवरात्रीला इथं उत्सव साजरा होतो.

## २७ सिंगेश्वर

बिहारातल्या साहरस जिल्ह्यात सिंगेश्वर नावाचं एक शिवस्थान–शिवमंदिर आहे. दशरथानं केलेल्या पुत्रकामेष्टी यज्ञाच्या वेळी ऋष्यशृंग मुनीनं या शिवाची स्थापना केल्याचं सांगतात. या देवस्थानाबद्दलची कथा अशी–

भगवान शिव एकदा श्लेष-आत्मक नावाच्या अरण्यात जायला

निघाला, तेव्हा " मी कुठं गेलोय ते कुणाला सांगू नकोस." असं तो नंदीश्वराला बजावून गेला. ब्रह्मा व विष्णू यांच्यासह इंद्र शिवाला भेटायला आला, तेव्हा नंदीश्वराला त्यांनी शिवाचा ठावठिकाणा विचारला. तर त्यानं अर्थातच सांगितलं नाही. मग ते शोधत शोधत श्लेष-आत्मक अरण्यात गेले. शिवानं मुद्दाम हरणाचं रूप घेतलं होतं. तरीसुद्धा देवमंडळीनं त्याला ओळखलं व त्याला पकडलं. इंद्रानं शिंगं पकडली, विष्णूनं पाय पकडले, तर ब्रह्मदेवानं त्याच्या अंगाला विळखा घातला. तरीपण त्यांना हिसडा देऊन हरीण त्यांच्या हातून निसटलं. इंद्राच्या हातात मोडकं शिंग तेवढं राहिलं. त्याचेही तीन तुकडे झालेले होते. आता काय करणार? एवढ्यात आकाशवाणी ऐकू आली— " देवांनो, शिव काही तुमच्या हाती लागणार नाही. शिंग हाती आलंय. तेवढ्यावरच समाधान माना." मग शिंगाचा एक तुकडा इंद्र स्वर्गात घेऊन गेला. दुसऱ्या तुकड्याची ब्रह्मदेवानं तिथंच स्थापना केली. तिसरा तुकडा विष्णूनं लोकांच्या कल्याणाकरिता पृथ्वीवरच स्थापला. पुढं मग त्याला सिंगेश्वर नावानं ओळखलं जाऊ लागलं.

महाशिवरात्रीनिमित्त सिंगेश्वराची मोठी यात्रा भरते.

## २८ मौनी अमावास्येची कथा

माघ महिन्याच्या अमावास्येला मौनी अमावास्या म्हणतात. मौन धरून प्रयागच्या त्रिवेणी संगमात स्नान केल्यानं विशेष पुण्यलाभ होतो, असं मानतात. सोमवारी ही तिथी आली, तर या दिवशीचं स्नान आणखीच पुण्यकारक मानलं आहे. बंगालमधे या अमावास्येची कथा प्रचलित आहे, ती अशी—

प्राचीन काळी एक विधवा ब्राह्मणी व एक गौळण या दोघी मैत्रिणी होत्या. ब्राह्मणीला लहान मुलगी होती. एकदा एक भिकारीण दारात आली असता, त्या मुलीला पाहून म्हणाली— " विधवा होण्याचं या मुलीच्या नशिबी आहे." ब्राह्मणीनं घाबरून विचारलं, " यावर

काही उपाय आहे का ?" भिकारीण बोलली, "सात मौनी अमावास्यांच्या उपासांचं आपलं पुण्य कुणी हिला दिलं, तर ही विधवा होण्याचं टळेल, पण त्याचबरोबर पुण्य देणारणीच्या घरची सगळी माणसं मात्र नष्ट होतील." गवळणीनं ते पुण्य जोडलं होतं. आपल्या मैत्रिणीच्या मुलीला तिनं ते दिलं. नंतर त्या मुलीच्या लग्नाच्या दिवशीच तिच्या नवऱ्याचा मृत्यू ओढवला खरा, पण तो काही वेळानं पुन्हा जिवंत झाला. त्याचबरोबर तिकडं गवळणीच्या घरच्या सगळ्या माणसांचं मरण ओढवलं. तेव्हा वाडगाभर दही घेऊन गवळण अरण्यात गेली आणि तिथल्या महारोगी मुनीच्या अंगावर ते दही तिनं ओतून टाकलं. तेव्हा तत्काल नारायण प्रकट झाला. मग त्यानं गवळणीच्या घरची सगळी मेलेली माणसं पुन्हा जिवंत केली.

---

## २९ तिलचतुर्थी

माघ शु० ४: या तिथीला तिलचतुर्थी म्हणतात. गणपतीची पूजा करून तिळा व आज्य यांनी हवन करतात. तसंच तिळमिश्रित गुळाचे लाडू खातात. रात्री जागरण करायचं असतं या तिथीला कुंदचतुर्थीही म्हणतात. या दिवशी कुंदफुलांनी शिवाची पूजा करून नक्त भोजन करणाऱ्याला लक्ष्मी प्राप्त होते, असं सांगितलं आहे.

काशी क्षेत्रात ढुंढिराज नावाचं गणेशाचं स्थान आहे. या तिथीला ढुंढिराजाची पूजा करून त्याला तिळाच्या लाडवांचा नैवेद्य दाखवतात. यांच्याबद्दल कथा आहे, ती अशी—

दुरासद हा दैत्य काशीच्या लोकांना पीडा देऊ लागला. तेव्हा गणेशानं दिव्य अवतार घेऊन त्याला मारलं आणि भयमुक्त केलेलं काशीक्षेत्र शंकराच्या स्वाधीन केलं. शंकरानं मग ढुंढिराज नावानं आपल्या उजव्या अंगाशी त्याची स्थापना केली. तेव्हापासून काशीयात्रा करताना ढुंढिराजाचं दर्शन घेणं आवश्यक होऊन बसलं.

## ३० अग्निवेताळाची कथा

प्राचीन काळी उज्जयिनीचा राजा भर्तृहरी याला जीवनाचा वीट आला, म्हणून आपला भाऊ विक्रम याला आपल्या जागी राज्यावर बसवून तो तप करायला अरण्यात निघून गेला. ही संधी साधून अग्निवेताळ अवन्ती नगरीला पीडा देऊ लागला. मंत्रीमंडळी ज्याला म्हणून राज्यावर बसवीत, त्याला त्याच रात्री वेताळ मारून टाकू लागला. असा प्रकार वारंवार घडू लागल्यानं राजा होण्यास कुणीही तयार होईनासा झाला.

एकदा विक्रम वेष पालटून अवन्तीस आला. 'या देशाला राजा का नाही ?' असं त्यानं मंत्र्यांना विचारलं, तेव्हा मंत्र्यांनी त्याला कारण सांगितलं. ते ऐकून आपण राजा होण्यास तयार आहोत असं विक्रमानं सांगितलं. म्हणून त्यांनी त्याला तात्पुरता अभिषेक केला.

रात्री अग्निवेताळ येईल, त्याच्याशी लढायला हाती तलवार घेऊन विक्रम सज्ज राहिला. आणि मध्यरात्रीला अग्निवेताळ आला, तोच विक्रमाच्या अंगावर धावून गेला. तेव्हा विक्रम त्याला म्हणाला,

"तुझ्यासाठी भोजन तयार ठेवलं आहे. ते आधी खाऊन घे. मग वाटल्यास तू माझ्याशी युद्ध कर."

अग्निवेताळ चमकला. हा कुणीतरी शूर पुरुष आहे, हे त्यानं जाणलं. भोजनाला त्याला नकार देववेना. भोजन केल्यावर तो विक्रमाला म्हणाला, "तू खरा शूर पुरुष आहेस. मी प्रसन्न झालो तुझ्यावर. खुशाल अवन्तीचं राज्य कर. पण रोज मला एक बळी द्यायची माझी अट तू पुरी करायला हवीस."

दुसरा दिवस उजाडला तरी विक्रम जिवंत राहिलेला पाहून मंत्री चकित झाले. त्यांना आनंदही झाला.

अग्निवेताळ रोज रात्री आपला बळी स्वीकारायला येऊ लागला. एका रात्री विक्रमानं त्याला सवाल केला– "तुझं ज्ञान आणि सामर्थ्य कितीसं आहे ?"

वेताळ उत्तरला, "मला सर्व गोष्टीचं ज्ञान आहे. आणि वाटेल

ते सिद्ध करायला मी समर्थ आहे."

"मला आयुष्य किती आहे ते सांग पाहू." विक्रम बोलला.

"शंभर वर्षं." वेताळ उत्तरला.

"बऽरं!" विक्रम उद्‌गारला, "माझं आयुष्य तू कमी करू शकतोस का?"

"तसं मात्र मला करता येणार नाही." वेताळानं कबुली दिली. मग भोजन करून तो निघून गेला.


दुसऱ्या रात्री वेताळ आला, तेव्हा त्याच्या भोजनाची तयारी केलेली नव्हती. ते पाहून तो भडकून उठला. तेव्हा विक्रम शांतपणे म्हणाला, "माझं आयुष्य कमी करण्याचं सामर्थ्य तुझ्यात नाही. मग मरणाच्या भीतीनं तुला रोज भोजन पुरवायची मला गरजच काय? हवं तर माझ्याशी सामना कर. मी लढायला तयार आहे."

वेताळ चमकला. विक्रमाचं चातुर्य पाहून तो संतुष्ट झाला. म्हणाला, "तुझा शूरपणा पाहून मी प्रसन्न झालोय. हवा तो वर मागून घे."

विक्रम बोलला, "तर मग मी तुझी आठवण काढीन तेव्हा तू हजर हो आणि मी सांगेन ते काम करीत जा."

विक्रमाचं म्हणणं मान्य करून वेताळ निघून गेला.

दुसऱ्या दिवशी आपण खरे कोण आहोत ते विक्रमानं मंत्र्यांना सांगितलं. ते ऐकून आनंदित झालेल्या मंत्र्यांनी त्याला रीतसर राज्याभिषेक केला.



## ३१ एक शमीवृक्ष व विहीर यांची कथा

पंढरपूरपासून पस्तीसएक मैलांवर महाळुंग या गावी अंबिका-देवीचे मोठे मंदिर आहे. या मंदिराच्या मंडपासमोरच संवदड (शमी) हा पुराण वृक्ष आहे. हा वृक्ष पवित्र मानून लोक त्याचीही पूजा करतात. या वृक्षाचे माहात्म्य असे सांगतात की, वातप्रकोपामुळे अंगात चमका येणाऱ्याने या वृक्षाला मिठी मारली, तर त्याच्या अंगातल्या चमका बंद होतात. या वृक्षानजीक असलेल्या मोठाल्या चौकोनी विहिरीबद्दलही अशीच वदंता आहे. वर्षभरात एकदा म्हणे या विहिरीत गंगेचे पवित्र तीर्थ येऊन मिसळते. त्यावेळी विहिरीचे पाणी चक्क पांढरेशुभ्र बनते. या पाण्यात स्नान केल्याने अनेक रोग नाहीसे होतात, अशी समजूत प्रचलित आहे. म्हणून या पर्वणीच्या वेळी दूरदूरचेसुद्धा भाविक लोक तिथे स्नान करायला येतात.

महाळुंग गावात अगणित माकडे आहेत, त्यांना अंबिकादेवीची लेकरे मानले जाते. म्हणून त्यांना धरून नेण्याचे धाडस कुणी करीत नाही. तसा प्रयत्न करणाऱ्याचा निर्वंश होतो, अशी समजूत लोकांत रूढ आहे, हेही त्याचे एक कारण असावे. या माकडांच्या म्होरक्याला 'पाटील' म्हणतात. देवीची यात्रा होते, त्यावेळी या पाटीलबुवाला आहेर करण्याचा रिवाज आहे. मंगळवारी व शुक्रवारी देवीच्या दर्शनाला येणारे लोक या माकडमंडळीला अगत्याने खाद्यपदार्थ खाऊ घालतात.

## ३२ जुळ्या राजपुत्राच्या नशिबाचा

ही आहे एक लोककथा. कोणे एके काळी एका नगरीच्या राजाला दोन जुळे पुत्र झाले. मृदंग व सारंग अशी त्यांची नावं ठेवण्यात आली. त्या जुळ्या भावांत, त्यांतल्या त्यात सारंग धाकटा दिसायचा.

दोघेही भाऊ बुद्धिमान असल्यानं वाढता-वाढता सर्व विद्यांत निपुण झाले. ते तरुण झाले, तरीही शिकारीला वगैरे जोडीनंच जायचे:

एके दिवशी राजा नगरीतून फेरफटका करीत होता. तर त्याला

जिकडें तिकडे साधू-बैरागी आणि भिकारी यांचा सुळसुळाट झालेला दिसला. त्याच्या मनात आलं–या असंख्य फुटक्या लोकांना राजवाड्याच्या कोठारातून व लोकांकडून दानधर्म केला जातो हे काही बरं नव्हे. राजा लहरी होता. त्यानं ताबडतोब या दानधर्माला बंदी करण्याचं ठरवलं. लगेच सगळीकडं दवंडी पिटायला लावली, की जो कोणी अशा लोकांना दानधर्म करील, त्याला कडक शिक्षा होईल. प्रसंगी फाशीसुद्धा देण्यात येईल आणि या हुकमाची अंमलबजावणी नीट होतेय की नाही, हे पाहण्यासाठी त्यानं सर्वत्र कडक बंदोबस्त ठेवला.

एकदा परगावचे दोन साधू भिक्षा मागायला राजनगरीत आले. नगररक्षकांनी त्यांना जवळच्या अरण्यात पिटाळलं. अरण्याची वाट चालता–चालता तो साधू भुकेनं बेजार झाला. अखेर थकूनभागून ते एका झाडाखाली विसावा घेत बसले. त्याच अरण्यात शिकारीला जात असलेले मृदंग व सारंग यांची नजर या साधूंकडं गेली. त्यांची दीनवाणी स्थिती पाहून राजपुत्रांना त्यांची दया आली. लगेच सारंगानं एका साधूला आपल्या हातातली हिऱ्याची अंगठी बहाल केली; तर मृदंगानं आपल्या गळ्यातला मोत्यांचा कंठा काढून दुसऱ्या साधूला दिला. आणि मग ते उभयबंधू पुढल्या दाट अरण्यात शिकारीला निघून गेले.

इकडे, आपला हुकूम नीट पाळला जात आहे की नाही, याची पाहणी करण्यासाठी खुद्द राजा वेष पालटून जिकडे-तिकडे फिरू लागला. तर दोघे साधू एका धर्मशाळेत स्वयंपाक करीत असलेले त्याच्या नजरेस पडले. कुठल्याही धर्मशाळेत किंवा रस्त्यावर एकही साधू किंवा भिकारी फिरकत नसताना हेच कोण दोघेजण इथं उपटले ?–असा प्रश्न राजाला पडला. कुणीतरी आपला हुकूम मोडून या साधूंना भिक्षा घातली असली पाहिजे. तो मनातून संतापला. त्यानं कसून चौकशी केली. तर प्रत्यक्ष दोघेही राजपुत्र गुन्हेगार ठरले होते.

गुन्हेगार राजपुत्र असले, तरी त्यांनाही कडक शासन करण्याचं त्यानं ठरवलं या बाबतीत त्यानं प्रधानाशी सल्लामसलत केली. ही बाब नाजूक असल्यानं हिकमतीनं हाताळायला हवी, हे जाणून प्रधानानं शिक्षेची अंमलबजावणी करण्याची कामगिरी स्वतः पत्करली. अरण्या-

तल्या अरण्यातच त्यानं त्यांना गाठलं आणि राजाचा हुकूम म्हणून त्यानं तिथूनच हद्दपार केलं. प्रत्यक्ष राजपुत्रांना कडक शिक्षा सुनावण्यात आल्यानं राजाच्या न्यायीपणाबद्दल प्रजाजनांची खातरजमा झाली.

दोघेही भाऊ अरण्य पार करून एका मोठ्या नदीपाशी येऊन ठेपले. नदीपलीकडं त्यांना एक नगरी दिसली, पण नदी ओलांडण्यापूर्वी ते त्या नदीकाठावरच्या एका झाडाखाली थोडा वेळ विसावा घेत बसले. तर त्याच झाडावर कोकीळ व मैना यांचा संवाद चालला होता. त्यातून निष्पन्न झालं ते असं— दक्षिणेस पाचेक कोस अंतरावर एक भला मोठा कदंब वृक्ष असून त्याच्या ढोलीत सात फणांचा नाग आहे. त्या सर्व फणा जो कुणी छाटून टाकील, त्याला मुबलक हिरेमाणकं मिळून त्याचं भाग्य उजळेल.

सारंगाला पशुपक्ष्यांची भाषा समजायची. त्यामुळं त्यांचा तो संवाद ऐकून तो आश्चर्यचकित झाला. मृदंगाला ही हकीगत त्यानं सांगितली, तसा तोही चकित झाला. त्या माहितीचा छडा लावण्याची दोघांनाही उत्कंठा लागली, आणि घोड्यांवर बसून ते तडक दक्षिण दिशेला दौडत निघाले. आणि नवल असं की, पाचेक कोसांवर त्यांना एक भला थोरला कदंब वृक्ष अगदी ढोलीसह आढळला. ते हलकेच घोड्यांवरून उतरले. आणि आपली चाहूल लागू न देता त्यांनी सावध-पणे ती ढोल निरखून पाहिली. तर चक्क सात फणांचा नाग त्या ढोलीत वेटोळे घालून बसलेला होता. दोघांनीही आपल्या तलवारी सर-सावल्या आणि नागाची तोंडं दुसऱ्या दिशेला असल्याची संधी साधून, दोघांनी मिळून त्याच्या सातही फणा सपासप छाटून टाकल्या. आणि त्या पाखरांच्या संवादाची पुरेपूर प्रचीती आणून देणारा तो चमत्कार घडला: पण छाटलेल्या त्या सगळ्या डोक्यांतून हिरे-माणकांचा असा काही वर्षाव सुरू झाला, की त्यांचा भलाथोरला ढीगच बनला. तो ढीग त्यांनी अर्धा-अर्धा वाटून घेतला.; आणि ते पुन्हा मूळ जागेवर, नदी-लगतच्या त्या झाडापाशी आले. मग आपल्या घोड्यांसह नदी ओलांडून त्यांनी त्या नगरात प्रवेश केला.

नगराच्या एका चौकात दोघेही घोडेस्वार पोचतात, तोच समो-

रून एक रथ दौडत आला; आणि तसाचवेगानं निघून गेला. तो रथ तिथल्या राजाचा असावा, असा तर्क ते लढवीत असतानाच या दोघांचे घोडे त्या रथाला बुजून उधळले आणि दोघे दोन दिशांना भरकटत गेले. आपापला घोडा शांत होताच दोघांनीही आपापल्यापरी दुसऱ्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. पण दोघा भावांची भेट काही घडून आली नाही. एक घोडेस्वार दुसऱ्या नगराच्या दिशेनं गेल्याचं कुणीतरी सारंगला दडपून सांगितलं. म्हणून तो त्या बाजूला वळला.

थकल्या-भागलेल्या मृदंगानं नगरातल्या एका धर्मशाळेत त्या रात्री मुक्काम केला. सारंगाची फारकत झाल्यामुळं तो चिंतेत होता. तर तिथं त्याला कळलं, की, तिथल्या राजाला अत्यंत रूपवान अशी एक उपवर कन्या आहे. आणि तिला हिरे-माणकं एवढी आवडतात, की, अशी दुर्मिळ मौल्यवान हिरे-माणकं जो आणून देईल, त्याच्याशी लग्न करण्यास ती तयार आहे. आपल्याला मिळालेली हिरे-माणकं निश्चितच दुर्मिळ व बहुमोलाची आहेत. त्यांतली थोडी या राजकन्येला दाखवून पाहावीत. तिला ती खात्रीनं पसंत पडतील ! असा विचार करून, आपल्याजवळची निवडक रत्नं घेऊन तो राजकन्येच्या भेटीस गेला. राजकन्येनं राजासमक्ष ती न्याहाळून पाहिली. ती पाहून ती बेहद्द खूष झाली. मृदंगाशी लग्न करायला ती अर्थात राजी झाली, शिवाय तिला राजबिंडा दिसणारा मृदंगही आवडला होता.

आपण राजपुत्र आहोत, याची जाणीव मृदंगानं अजून कुणाला दिली नव्हती. आपण एकटे असून आपलं दुसरं कुणीही नाही, असं त्यानं सांगितलं होतं. भावी जावयाची आता स्वतंत्र महालात राहायची सोय करायची होती. म्हणून, त्याच्या सामानासह त्याला महालात घेऊन जाण्यासाठी खुद्द प्रधान त्याच्याबरोबर धर्मशाळेत आला. पण तिथं राजपुत्र पाहतो, तर त्याचा घोडा जाग्यावर नाही. एवढंच नव्हे, तर घोड्याचं जीन व इतर सामान जिथं लपवून ठेवलं होतं तेही जाग्यावर नाही. त्या जीनमध्ये तर त्यानं आपल्याजवळची उरलेली हिरेमाणकं भरून ठेवली होती. त्यामुळं मुख्यतः जीन लंपास झाल्यानं तो कावराबावरा झाला. आपलं सामान व घोडा चोरीस गेल्याचं त्यानं

प्रधानाला सांगितलं.

प्रधानानं चोराचा शोध घेण्यासाठी रक्षक व गुप्तहेर सगळीकडं पाठवण्याची व्यवस्था ताबडतोब केली.

चोराचा तपास अजून लागला नव्हता. तरीपण मृदंगाचं व राजकन्येचं लग्न राजेशाही थाटात झालं. ती दोघं स्वतंत्र महालात राहू लागली. आपण आनंदात असल्याचं मृदंग वरपांगी दाखवीत होता. पण सारंगाच्या विरहानं तो मनातून उदास होता. आपलं दुसरं कुणीही नाही, असं आधीच तो सांगून बसला होता. त्यामुळं सारंगाचा शोध घेण्याची गोष्ट तो काढू शकत नव्हता.

तिकडं सारंग ज्या राज्यात जाऊन ठेपला, तिथं त्या राजाचं शत्रुसैन्याशी तुंबळ युद्ध चालू होतं. त्यात शत्रुसैन्याची सरशी होत असून राजाचा पराभव अटळ असल्याची चिन्हं दिसू लागली होती. सारंग तलवारबहाद्दर होता. राजाला मदत करण्याचं त्यानं ठरवलं. एकंदर रणक्षेत्राची पाहणी करून त्यानं राजाचे निवडक सैनिक आपल्या हाताशी घेतले. मग शत्रुसैन्याच्या पिछाडीवर त्यानं आकस्मिक हल्ला केला. राजाला कुणीकडून तरी नवीन कुमक आली, अशा समजुतीनं शत्रुसैन्य बिचकलं. तेव्हा त्याच्या गोंधळलेल्या मन:स्थितीचा फायदा घेऊन सारंगानं शिताफीनं मुसंडी मारली. त्यामुळं शत्रुसेनेची दाणादाण उडाली. ऐन तोंडावर आलेला राजाचा पराभव टळून त्याचं विजयात रूपांतर झालं. या विजयाला कारणीभूत ठरणाऱ्या सारंगाची सर्वांनी वाहवा केली. राजानं त्याला गौरवानं राजनगरीत नेलं.

प्रथम सारंगाला एका खास महालात ठेवण्यात आलं. मग खास दरबार भरवून राजानं त्याचा समारंभपूर्वक गौरव केला. या राजबिंड्या शूर तरुणाचं लग्न आपल्या एकुलत्या एक सौंदर्यशाली कन्येशी करण्याचं राजानं मनाशी ठरवलंच होतं तर त्यानं भर दरबारात आपला हा इरादा जाहीर केला.

आणि थोड्यात दिवसांत सारंगाशी त्या राजकन्येचं लग्न राजेशाही थाटात पार पडलं. त्याचवेळी आपल्याजवळची हिरे-माणकं सारं-

गानं आपल्या नववधूस अर्पण केली. बहुमोल रत्नांचा नजराणा पाहून राजा व राजकन्या कमालीची खूष झाली. रूपवान राजकन्येशी लग्न झाल्यामुळं सारंगाला आनंद झाला. तरीपण मृदंगाच्या विरहामुळं तो मनातून उदास होता. त्याचा शोध कुठं, कसा घ्यावा याचा विचार तो रात्रंदिवस करायचा.

एकदा राज्यकारभाराचा भार सारंगावर सोपवून राजा काही कामासाठी बाहेरगावी गेला होता. त्यावेळी दरबारात राजनगरीतला बडा सराफ येऊन दाखल झाला. सारंगाला अभिवादन करून तो म्हणाला : " माझ्या पेढीवर कुणीएक गृहस्थ मूल्यवान हिरेमाणकं घेऊन आलाय्. पैशाची नड भागवण्यासाठी त्यांतली थोडी रत्नं त्याला विकायची आहेत. पण तो माणूस खरोखरीचा श्रीमंत नसून त्यानं आण-लेली रत्नं हा चोरीचा माल असावा, असा दाट संशय त्याच्या वागण्या-वरून मला येतोय्. तेव्हा..." आणि बरोबर आणलेली काही रत्नं त्यानं सारंगाला दाखवली.

ती रत्नं सारंगानं पाहताक्षणीच ओळखली. कारण ती त्याच्या-जवळच्या रत्नांसारखीच होती. अर्थात ती मृदंगाजवळची असली पाहिजेत, असा तर्क त्यानं केला. म्हणजे...सराफाच्या पेढीवर आलेला माणूस खुद्द मृदंग तर नसेल ? त्याला ताबडतोब पाहण्याची सारंगाला उत्कंठा लागली. म्हणून तो त्या सराफाबरोबर लगेच त्याच्या पेढीवर गेला. पण रत्नं विकू पाहणारा तो माणूस मृदंग नाही, असं सारंगाला दिसून आलं. तेव्हा मृदंगाजवळची रत्नं या माणसानं कशी-ना-कशी लुबाडली असावीत, अशी शंका त्याला आली. पेढीबाहेर त्यानं आपला घोडा उभा केला होता. तो घोडा तर मृदंगाचाच असल्याचं सारंगानं तत्काल ओळखलं. म्हणजे...या माणसानं मृदंगाचा घोडाही पळवलेला दिसतो. एकूण हा बिलंदर चोर असला पाहिजे. बरोबरच्या रक्षकांना सांगून सारंगानं त्या माणसाला तत्काळ कैद केलं.

कोठडीत त्या माणसाला खोड्यात घालण्याचा इंगा दाखवताच घोडा व रत्नं आपण एका धर्मशाळेतून चोरल्याचं त्यानं कबूल केलं. त्याच्याकडून रत्नं व घोडा हस्तगत करण्यात आली. मग मिळालेल्या

माहितीवरून त्या नगरीत सारंगानं भावाचा शोध घेतला, तेव्हा तो तिथल्या राजाचा जावई होऊन राजमहालात राहत असल्याचं त्याला आढळून आलं. बऱ्याच दिवसांनी पुन्हा दोघां भावांची भेट झाली.

थोड्याच दिवसांनी दोघेही भाऊ आपापल्या राण्यांसह बापाच्या राजनगरीत गुपचूप गेले. प्रथम त्यांनी प्रधानाची गुप्तपणे भेट घेतली. तर त्यांना कळलं, की पुत्रांच्या विरहानं राजाची प्रकृती खंगली आहे. ते कधी एकदा परत भेटतील, असं त्याला झालंय्. राज्यातली प्रजाही राजपुत्र परत यावेत म्हणून आसुसली आहे. ही हकीगत समजताच दोघेही राजपुत्र प्रेमानं राजाला जाऊन भेटले. राजा आता म्हातारा होत आला होता. म्हणून त्यानं दोघाही राजपुत्रांना राज्याभिषेक केला. दोघांच्याही सासऱ्यांना वारस असा पुत्र नसल्यानं त्यांनी आपापल्या राज्याचा बहुतांश हिस्सा आपापल्या जावयाच्या राज्याला स्वखुषीनं जोडून दिला.

---

## ३३ विजयाएकादशी

वनवासाच्या काळात राम पंचवटीत राहत असताना रावणानं सीतेला पळवून नेलं. पण पुढं हनुमान व सुग्रीव यांच्या साहाय्यानं वानरसैन्यासह राम लंकेवर स्वारी करण्यासाठी समुद्रतीरी गेला. मधला अफाट सागर ओलांडून लंका कशी गाठायची या चिंतेत राम पडला. तिथं जवळच बकदाल्भ्य या ऋषीचा आश्रम होता. त्याच्याकडं जाऊन रामानं आपली अडचण त्याच्या कानावर घातली. ऋषीनं त्याला विजयाएकादशीचं व्रत करण्याचा सल्ला दिला, तेव्हा रामानं वानर-मंडळींसह ते व्रत केलं. त्याचं पुण्य लाभून रामाला समुद्र पार करता आला व रावणाचा संहार करता आला.

माघ व. ११ : या तिथीला विजयाएकादशी म्हणतात. या व्रतामुळं विजय प्राप्त होतो, असं सांगितलं आहे. पद्मपुराणात या व्रताबद्दल कथा दिली आहे.

म. सं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. 7063 25.2.75
विषय धा.धा.
BVBK-0401763